## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ३

## सभावृत्तांत

दिनांक – १९.०५.२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे-२०१७ ची मा.महापालिका सभा शुक्रवार दि.१९.०५.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.दत्तात्रय बाबूराव साने

७) मा.अश्विनी संतोष जाधव

८) मा.सारीका शिवाजी सस्ते

९) मा.राहुल गुलाब जाधव

१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.बोईनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा.ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२७) मा.सावळे सिमा रविंद्र

२८) मा.लोंढे नम्रता योगेश

२९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०) मा.लांडे विक्रांत विलास

३१) मा.गीता सुशिल मंचरकर

३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३५) मा.केशव हनुमंत घोळवे

३६) मा.मंगला अशोक कदम

३७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३८) मा.अश्विनी भिमा बोबडे

३९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४०) मा.संजय बबन नेवाळे

४१) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४२) मा.भालेकर प्रविण महादेव

४३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४६) मा.घोलप कमल अनिल

४७) मा.पवळे सुमनताई मधुकर

४८) मा.चिखले सचिन तुकाराम

४९) मा.जावेद रमजान शेख

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.प्रमोद कुटे

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६०) मा.ढाके नामदेव जनार्दन

६१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६२) मा.करुणा शेखर चिंचवडे

६३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६४) मा.भोईर सुरेश शिवाजी

६५) मा.अपर्णा निलेश डोके

६६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६९) मा.कोमल दिपक मेवानी

७०) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७१) मा.सुलक्षणा राजू धर

७२) मा.शाम गणपतराव लांडे

७३) मा.सुजाता सुनिल पालांडे

७४) मा.योगेश मंगलसेन बहल

७५) मा.कदम निकीता अर्जुन

७६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७९) मा.नढे विनोद जयवंत

८०) मा.काळे उषा दिलीप

८१) मा.कोकणे संतोष अंकुश

८२) मा.पवार मनिषा प्रमोद

८३) मा.बारणे अर्चना तानाजी

८४) मा.अभिषेक गोविंद बारणे

८५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८६) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८) मा.बारणे माया संतोष

८९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९०) मा.दर्शले रेखा राजेश

९१) मा.कलाटे राहुल तानाजी

९२) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९३) मा.कामठे तुषार गजानन

९४) मा.चोंधे आरती सुरेश

९५) मा.कस्पटे संदिप अरुण

९६) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९७) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९८) मा.सुनिता हेमंत तापकीर

९९) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१००) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०१) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०२) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०३) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०४) मा.मुंढे उषा अंकुश

१०५) मा.कदम शशिकांत गणपत

१०६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०९) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११०) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१११) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११२) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११३) मा.नवनाथ दत्तू जगताप

११४) मा.संतोष बबन कांबळे

११५) मा.सोनवणे शारदा हिरेन

११६) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- महापालिका आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा,पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दंडवते, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.पाटील - कार्यकारी अभियंता, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

------

मा.महापालिका सभा ठराव क्र.९ दिनांक- २०/०४/२०१७ अन्वये ०२ नविन प्रभाग समित्या निर्माण करण्यास मान्यता दिली असून सदर ०२ प्रभाग समित्यांकरीता नव्याने

पदनिर्मिती करणेस मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, जम्मु काश्मीर मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले तीन जवान, पुंछ जिल्ह्यात दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले दोन जवान तसेच अब्दुल गनी दार-पीपल डेमोक्रॅटीक पक्षाचे (पीडीपी) नेते, विनोद खन्ना-माजी केंद्रीय मंत्री, विद्यमान खासदार व ज्येष्ठ अभिनेते, अर्जुन तुळशीराम तथा ए.टी.पवार - कळवण विधानसभेचे माजी आमदार, माजी आदिवासी विकास मंत्री, अतुल तापकीर - मराठी चित्रपट निर्माते, नवनाथ कांबळे - पुणे महानगरपालिकेचे विद्यमान उपमहापौर, रिमा लागु - ज्येष्ठ अभिनेत्री, अनिल माधव दवे- केंद्रीय पर्यावरण व वन मंत्री यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्व दिवंगत व्यक्तींना श्रध्दांजली वाहून आजची सभा दु.२.३५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** आजची सभा शुक्रवार दि.१९/०५/२०१७ रोजी दुपारी २.३५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-------

(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ३

## सभावृत्तांत

## (दि.१९/५/२०१७ (दु.२.००) ची तहकूब सभा)

दिनांक – १९.०५.२०१७ वेळ – दुपारी २.३५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१९/०५/२०१७ (दु.२.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा शुक्रवार दि.१९.०५.२०१७ रोजी दुपारी २.३५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.दत्तात्रय बाबूराव साने

७) मा.अश्विनी संतोष जाधव

८) मा.सारीका शिवाजी सस्ते

९) मा.राहुल गुलाब जाधव

१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२६) मा.सावळे सिमा रविंद्र

२७) मा.लोंढे नम्रता योगेश

२८) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.केशव हनुमंत घोळवे

३४) मा.मंगला अशोक कदम

३५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३६) मा.अश्विनी भिमा बोबडे

३७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३८) मा.संजय बबन नेवाळे

३९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४०) मा.भालेकर प्रविण महादेव

४१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४४) मा.घोलप कमल अनिल

४५) मा.पवळे सुमनताई मधुकर

४६) मा.चिखले सचिन तुकाराम

४७) मा.जावेद रमजान शेख

४८) मा.यादव मीनल विशाल

४९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५०) मा.प्रमोद कुटे

५१) मा.राजू मिसाळ

५२) मा.बाबर शर्मिला राजू

५३) मा.अमित राजेंद्र गावडे

५४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५७) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५८) मा.ढाके नामदेव जनार्दन

५९) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६०) मा.करुणा शेखर चिंचवडे

६१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६७) मा.कोमल दिपक मेवानी

६८) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६९) मा.सुलक्षणा राजू धर

७०) मा.शाम गणपतराव लांडे

७१) मा.सुजाता सुनिल पालांडे

७२) मा.योगेश मंगलसेन बहल

७३) मा.कदम निकीता अर्जुन

७४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७७) मा.नढे विनोद जयवंत

७८) मा.काळे उषा दिलीप

७९) मा.कोकणे संतोष अंकुश

८०) मा.पवार मनिषा प्रमोद

८१) मा.बारणे अर्चना तानाजी

८२) मा.अभिषेक गोविंद बारणे

८३) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८४) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८५) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६) मा.बारणे माया संतोष

८७) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८८) मा.दर्शले रेखा राजेश

८९) मा.कलाटे राहुल तानाजी

९०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९१) मा.कामठे तुषार गजानन

९२) मा.चोंधे आरती सुरेश

९३) मा.कस्पटे संदिप अरुण

९४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९६) मा.सुनिता हेमंत तापकीर

९७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९९) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१००) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०२) मा.मुंढे उषा अंकुश

१०३) मा.कदम शशिकांत गणपत

१०४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०७) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०८) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०९) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११०) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१११) मा.नवनाथ दत्तू जगताप

११२) मा.संतोष बबन कांबळे

११३) मा.सोनवणे शारदा हिरेन

११४) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११५) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- महापालिका आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा,पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दंडवते, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.पाटील - कार्यकारी अभियंता, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा, सभागृह. कार्यपत्रिका क्रमांक-३ वरील विषय क्रमांक १० आणि वन के अंतर्गत दाखल विषय क्रमांक ११ प्राधान्य क्रमाने घेण्यात यावेत तसेच विषय क्रमांक २,३,४,५,६,७,८,९ आणि अ.क्र.१ वरील विषय हा सर्व विषयांचे शेवटी घेण्यात यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सूचना मान्य करण्यात येत आहे.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, आपल्या महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त मा.श्रावण हर्डीकर हे याठिकाणी रुजू झालेले आहे व आज ते प्रथमच जीबीमध्ये उपस्थित आहेत, मा.महापौरांना विनंती करतो की सभागृहाच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात यावे.

**मा.नगरसचिव-** मा.उपमहापौर, मा.पक्षनेते, मा. विरोधी पक्षनेते, मा.सभापती स्थायी समिती, मा.सर्व गटनेते व मा.सर्व पदाधिकारी यांनी मा.महापालिका आयुक्त यांचे स्वागत करणेकामी विनंती करण्यात येत आहे.

(मा.महापौर, मा.उपमहापौर व मा.सर्व पदाधिकारी यांचे हास्ते मा.श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. व मा.महापालिका आयुक्त यांनी आपला परिचय सभागृहास करुन दिला.)

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह नेते सर्व पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेवीका या सर्वांचे मनापासून स्वागत करतो. विशेषत: आपले नवनिर्वाचित आयुक्त श्रावण हर्डीकर साहेब आपले सभागृहाने स्वागत केलेले आहे. आपल्या नियुक्तीने आम्हां सर्वांना निश्चित आनंद झालेला आहे. याठिकाणी आलेल्या प्रत्येक नगरसेवकांचा मानस आणि केंद्रबिंदू असाच आहे की या शहराचा विकास व्हावा, सर्वांगीण विकास व्हावा. छोटेछोटे जे प्रश्न आहेत विशेषत: पाण्याचा, स्वच्छतेचे प्रश्न असतील, दैनंदिन जीवनातील सर्वसामान्य नागरीकांशी निगडीत प्रश्न असतील, वायसीएम हॉस्पिटल सारखा एकदम मोठा पांढरा हात्ती म्हणून ज्याच्याकड पुर्वी पाहीले जात होते, परंतु आज फक्त पिंपरी चिंचवड शहरातूनच नव्हतेतर महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून या वायसीएम हॉस्पिटलमध्ये रुग्ण तेथे येतात त्यांची सेवा त्याठिकाणी होत असते. आपण आल्यानंतर आपण काही चांगले निर्णय घेतलेले आह्त ते ऐकूण आम्हांला आनंद झाला. विशेषत: आपण स्वच्छतेबाबतची बैठक घेतली, ईंजिनीअर लोकांकडून माहिती घेतली. तुम्ही पाणीपुरवठयासाठी, ड्रेनेजसाठी, सिव्हरेज सिस्टीमसाठी काय केले याच्यावर आपण अधिका-यांशी चर्चा केली. तेही आम्हांला बरं वाटल आहे. नागपूर महापालिकेमध्ये आपण आयुक्त म्हणून काम केलेले आहे तेथील अडीच वर्षाचा आपल्याला अनुभव आहे हे सांगीतलेल आहे. या शहरातील पण काही जटील प्रश्न आहेत त्याच्याकडे आपण निश्चित बारकाईने लक्ष दयाल. आम्ही आता विरोधामध्ये असलोतरी विरोधासाठी वरोध ठेवून

आम्ही काम करणार नाहीत याची ग्वाही आपल्याला आणि सभागृहाला देतो. चांगल्या कामासाठी निश्चितच आमची आपल्याला साथ असणार आहे. निर्णय घेत असताना सर्वांना विश्वासात घेवून जर आपण निर्णय घेतलातर आपल्यामध्ये दुफळी दिसणार नाही, दुमत दिसणार नाही. कारण शेवटी शहराच्या विकासाच्या अनुषंगाच्या दृष्टिने आपल्याला निर्णय घ्यायचे आहेत. त्याचबरोबर आपणच असे आयुक्त आहात की आल्याबरोबर बिल्डींग परमीशनची अमुक अमुक ही फाईल माझ्या पर्यंत का येते ती येऊ नये. वास्तविक पाहता आम्ही याच्या आधीच्या आयुक्तांना हे सांगत होतो परंतु त्यांनी कोणत्या इन्ट्रेस्टनी ठेवली हे माहित नाही. परंतु ते अधिकार सुध्दा त्या त्या संबंधित अधिका-यांना दिले. ताबडतोब टिडीआरची मिटींग घेऊन आपण निर्णय घेतला. म्हणजे थोडक्यात कामाचा सपाटा आपण लावलेला आहे आणि हीच पध्दत ख-या अर्थाने अपेक्षीत आहे. आपल्याकडे बजेट एवढ मोठ आहे, एवढया मोठया बजेटमध्ये अशा चांगल्या पध्दतीने काम केलंतर, अधिकाराचे विकेंद्रीकरण केले आणि तुमच नियंत्रण तुमचा अंकुश त्यावर ठेवलातर मला वाटत नाही कोणतीही बाधा येणार आहे. आपण आपला अंकुश प्रशासनावर व्यवस्थीत ठेवावा. याव्यतिरीक्त बाकीचेही प्रश्न आहेत परंतु आज आपल्या स्वागताच्या अनुषंगाने त्या प्रश्नाकडे मी आज आपल लक्ष वेधणार नाही. मी मनापासून आपल याठिकाणी विरोधी पक्षनेता या नात्याने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मी आपले मनापासून स्वागत करतो, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी प्रथमत: शिवसेनेचा गटनेता म्हणून मा.श्रावण हर्डीकर, आयुक्त साहेब यांचे स्वागत करतो. आताच योगेश बहल यांनी सांगीतल्याप्रमाणे आयुक्तांनी देखील पारदर्शक कारभाराला सुरवात केलेली आहे त्याची चुनूक दिसून येत आहे. अधिका-यांवर, प्रशासनावर वचक दिसतो. लोकांच्या हिताच्या कामासाठी त्या कामाला आमची संख्या कमी असलीतरी लोकांच्या हिताच्या कामासाठी मदत करणार आहोत. पुन्हा एकदा सहकार्य अपेक्षा व्यक्त करतो की आपण काम करत असताना निश्चितच पारदर्शक कराव. पक्षभेद न करता लोकांच्या हिताचे काम सर्वांना अपेक्षीत आहेत.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आदरणीय आयुक्त साहेबांचे सर्व विरोधी पक्षाच्या वतीने मी आपल मनपुर्वक स्वागत करतो. आताच योगेश बहल यांनी सांगीतले की शहरातील विवीध विषय आहेत. अनधिकृत बांधकाम असो, शास्तीकर असो, हॉस्पिटल सारखे विषय असो, शाळा असो याच्यामध्ये तुमचे आम्हांला भरपुर मार्गदर्शन लाभणारच आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आताच राहूल कलाटे यांनी सांगीतले सर्व विरोधी पक्ष असतील त्यांना समाविष्ट करुन घेवुन आपण येणा-या दिवसामध्ये नक्कीच व्यवस्थीत कारभार कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.राहुल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये नवीन नियुक्ती झालेले आयुक्त साहेब, श्रावण हर्डीकर यांना प्रथमत: पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, शहराच्या वतीने या सभागृहामधील भारतीय जनतापार्टी आणि सर्वांच्या वतीने मनापासून त्यांचे स्वागत करतो. या सभागृहाने या पिंपरी चिंचवड शहराचे खुप अधिकारी, पदाधिकारी पाहीलेले आहेत, खुप आयुक्त देखील या पिंपरी चिंचवड महापालिकेला लाभलेले आहेत. आजपर्यंत या शहरात काम करताना समतोल विकासजर साधायचा असेलतर या शहराचा विचार चांगल्या पध्दतीने होणे गरजेचे आहे. या शहरामध्ये अनेक योजना आहेत, अनेक विकास कामे प्रलंबीत आहेत ते करत असताना आमच्या ग्रामीण भागातील समाविष्ट झालेल्या १८ गाव आहेत त्यामध्ये आम्ही ग्रामीण भागातील नव्याने निवडून आलेलो नगरसेवक याठिकाणी आहोत. येणा-या काळामध्ये आपण आम्हांला सहकार्य करावे. सहकार्य करत असताना याठिकाणी आम्ही सुध्दा भारतीय जनता पर्टी म्हणून तुम्हांला सहकार्य करु. तुमचे सुध्दा सहकार्य भविष्यकाळात मिळावे अशी विनंती करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब तुमचं पिंपरी चिंचवड शहरामध्ये खुप खुप स्वागत. पहील्यांदा कोणीतरी नाही म्हणणारा अधिकारी आमच्या महानगरपालिकेला आपण लाभलात. नाही, म्हणण्याची ताकद असणारे आयुक्त याठिकाणी हवे होते त्यामुळे आपण आलात की काय. मनापासून मी तुमचे स्वागत करते. स्थायी समितीच्या दोन मिटींग मध्ये आपल्या कारभाराची चुनूक आम्हांला दिसलेली आहे. निर्णय घेताना योग्य काम असेलतर लगेच त्यावरती आपल्याला अपेक्षीत नसतं आमच्याकडन पण निर्णय व्हावा. खुप चांगल वाटल की एखादया विषयाची पुर्ण माहिती तुम्ही घेता. विषयपत्रीकेवरील विषय असेल त्याची माहिती आपल्याकडे असेल किंवा नसेल त्याच आपल्याला संपुर्ण नॉलेज असतं आणि ज्यावेळेस आपण विषय करायला सांगता त्यावेळेला खुप कौतूक करावस वाटत. याठिकाणी जाहीररीत्या परत आपलं कौतूक करते व तुम्हांला खुप खुप शुभेच्छा देते. आज जरी सगळयांनी आपल्याला शुभेच्छा दिलेल्या असल्या, विरोधी पक्षाने तरी येणारा काळ आपला खुप कठीण असणार आहे. कारण की सन्मा. विरोधी पक्षनेते जे आहेत त्यांची या सभागृहाची सहावी टर्म आहे. त्यामुळे ते जीतके गोड बोलतात त्यावेळी आम्हांला माहिती असतं की पुढे काय होणार आहे. तरी साहेब आपल्याला खुप खुप शुभेच्छा. आम्ही सर्वजण आपल्या बरोबर आहोत, या शहराचा उत्कर्ष आणि विकास आपल्या कार्यकाळात व्हावा अशा आपल्याला शुभेच्छा देते आणि थांबते. जयहिन्द, जय महाराष्ट्र !

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर हर्डीकर साहेबांचे याठिकाणी मी मनापासून अभिनंदन करतो. माझ्या अगोदरच्या सगळया वक्त्यांनी, मा.आयुक्तांच्या बद्दल विशेषत: योगेशभाईनी खुप चांगल मत व्यक्त केलेले आहे. खरंतर आयुक्त साहेब इंजिनीअर आहेत, मला असं वाटत की, ख-या अर्थाने या शहराला दिशा देण्याचे काम, या शहराला विकासाच्या दिशेने नेण्याच काम मा.आयुक्त साहेबांच्या कामामधुन निश्चितच होणार आहे. त्यांनी त्यांची ओळख करुन देत असताना डोंबीवली ते पिंपरी चिंचवड, यवतमाळ,

नागपूर असा त्यांनी बदलीचा प्रवास केला आहे. त्यांच्या बदलीच्या अगोदर पंधरा दिवस अगोदर मा.मुख्यमंत्री यांना आम्ही सांगीतले की साहेब, या शहरामध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता आली सत्ता येऊन उपयोग नाही, योगेशजीने सांगीतल की या महापालिकेच बजेट सुध्दा खुप मोठ आहे. बजेटची अंमलबजावणी तेवढयाच चांगल्या पध्दतीने झाली पाहीजे. मला वाटत की राहूल कलाटे ज्या पध्दतीने सांगत होते की शहराचा विकास समतोल होण गरजेच आहे. काही भागाचा विकास झाला परंतु उर्वरीत गाव आहेत त्याठिकाणी मा.महापौर ज्या प्रभागातून आले त्या भागाचाही विकास करण्यासाठी मा.आयुक्त साहेबांची निश्चितच मदत होणार आहे. राहूल कलाटे साहेब हे निश्चित खरं आहे की तुम्ही आम्हांला येथेच सोडून दिलं. आमची इच्छा मनामध्ये होती की तुम्ही राज्यामध्ये आमच्या बरोबर आहात, केंद्रामध्ये आमच्याबरोबर आहात, महापालिकेमध्ये आमच्या बरोबर तुम्ही किंवा तुमच्या बरोबर आम्ही आलो असतोतर आम्हांला आनंद झाला असता. आयुक्त साहेबांच्या नेतृत्वामध्ये पुढच्या तीन ते चार वर्षामध्ये आपली टर्म पुर्ण होईपर्यंत या शहराचा सर्वांगीन विकास ख-या अर्थाने आम्हांला करता येईल. मला वाटत की, प्रशासनाला महेंद्रसिंग धोनीसारखा एक चांगला कॅप्टन मा.मुख्यमंत्री यांनी दिलेला आहे. मी मा.मुख्यमंत्री साहेबांच आणि मा.आयुक्त साहेबांच याठिकाणी मनापासून अभिनंदन करतो. योगेशभाईनी सांगीतल की आम्ही चांगल्या गोष्टीला निश्चितच पाठिंबा देऊ. तुम्ही मा.आयुक्तांचे निश्चितच ऐकाल, आमच नाही ऐकलतरी चालेल, पुढच्या काळामध्ये त्यांच जरी ऐकलतरी आपण खुप चांगल्या पध्दतीने काम करु शकु. पुन्हा एकदा हर्डीकर साहेबांच मी मनापासून अभिनंदन करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.महापौर -** विषय क्रमांक १० प्राधान्याने घेणेत यावा.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २४ विषय क्रमांक – १०

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.आ.कक्ष/कावि/४४/२०१७ दिनांक ०९/०५/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या नियुक्तीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर नियम क्रमांक ५ नुसार ५ नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी दिनांक २९/३/२०१७, दिनांक २६/४/२०१७ व दिनांक ९/५/२०१७ चे पत्रानुसार मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.गटनेते यांना अनुक्रमे बुधवार दिनांक २९/०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता व त्यानंतर दिनांक ०९/०५/२०१७ रोजी

अनुक्रमे सकाळी ११.०० वाजता, दुपारी १.०० वाजता व सायं. ५.०० वाजता आमच्याकडे विचार विनिमय करण्याकरीता बोलाविण्यात आले होते.

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पक्षाचे वा गटाचे तौलनिक संख्याबळ खालील प्रमाणे आहे –

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांचेकडे नोंद झालेले पक्ष / गट / आघाडी | सदस्य संख्या | नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी | ७७ | ०३ |
| ०२ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ३६ | ०२ |
| ०३ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना | ०९ | ०० |
| ०४ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ०१ | ०० |
| ०५ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी -२०१७ | ०५ | ०० |
| | **एकूण सदस्य संख्या** | **१२८** | **०५** |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीतर्फे त्यांचे गटनेता (विरोधी पक्षनेता) मा.योगेश मंगसेन बहल यांनी दिनांक ०९/०५/२०१७ रोजी सकाळी ११.२५ वाजता १) श्री.संजय मल्हारराव वाबळे, व २) श्री.भोईर भाऊसाहेब सोपानराव यांची नावे नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून सुचविलेली आहेत. व तशी नामनिर्देशन पत्रे आवश्यक त्या पुराव्यांसह माझे स्वाधीन केली आहेत. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टीतर्फे त्यांचे गटनेता (सभागृहनेता) मा.एकनाथ रावसाहेब पवार यांनी दिनांक ०९/०५/२०१७ रोजी सायं.५.१५ वाजता ३) श्री.थोरात ज्ञानदेव मुरलीधर, ४) श्री.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू व ५) अ‍ॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे यांची नावे नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून सुचविलेली आहेत. तशी नामनिर्देशनपत्रे आवश्यक त्या पुराव्यांसह माझ्या स्वाधीन केलेली आहेत.

मा.सभागृहनेता/मा.विरोधी पक्षनेता/मा.गटनेत्यांशी विचारविनिमय करुन खालील उमेदवारांची सर्व कागदपत्रे तपासली असल्याने व त्यांच्याकडे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार लागणारी पात्रता असल्याने त्यांच्या नावाची शिफारस करणेत येत आहे.

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी | उमेदवाराचे नाव | अर्हता |
|---|---|---|---|
| ०१ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | श्री.संजय मल्हारराव वाबळे | महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत |
| ०२ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | श्री.भोईर भाऊसाहेब सोपानराव | |
| ०३ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | श्री.थोरात ज्ञानदेव | |

| | | | |
|---|---|---|---|
| | भारतीय जनता पार्टी | मुरलीधर | समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून पाच वर्षाचा अनुभव. |
| ०४ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी | श्री.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू | |
| ०५ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी | ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे | राज्यात कमीत कमी पाच वर्षा करीता अभिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्यामधील पदवीधारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षाचा अनुभव. |

वरील उमेदवारांनी पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ९ अन्वये जी अर्हता लागते तीच अर्हता व महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मध्ये नियम ४ मध्ये नमुद केलेली अर्हता त्यांच्याजवळ असल्याचे व महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम १० मधील अनर्हता नसल्याचे हमीपत्र / घोषणापत्र / शपथपत्र सादर केलेले आहे. सदर प्राप्त अर्जाची आवश्यक ती छाननी करुन वरील व्यक्तींची नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** नगरसचिव आपल्याला या संदर्भात थोडी माहिती देतील.

**मा.नगरसचिव –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ च्या अनुषंगाने नियम ३ नुसार पाच नामनिर्देशित पालीका सदस्यांचे नामनिर्देशन मा.महापालिका सभा करेल अशी तरतूद आहे. त्या अनुषंगाने मा.आयुक्त साहेबांनी त्याबाबतची कार्यवाही करुन पाच योग्य व्यक्तींची नाव मा.महापालिका सभेसमोर ठेवलेली आहेत. मा.आयुक्त साहेबांच्या आदेशानुसार या अनुषंगाने आज श्री.केतन राजेंद्र कांबळे यांनी एक नोटीस दिलेली आहे आणि त्यांनी दि.१५/५/२०१७ रोजी एक अर्ज दिलेला होता. त्याचप्रमाणे श्री.सुभाष माछरे यांनी एक पत्र दिलेल आहे. ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणुन देणेकामी मा.महापौर साहेबांकडे सुपूर्द करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, पत्र काय आहे ते वाचून दाखवावे.

(मा.नगरसचिव यांनी श्री.केतन राजेंद्र कांबळे यांच्या नोटीसीचे वाचन केले)

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच नगरसचिव यांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे ९ मे २०१७ रोजी वास्तविक पाहता या सर्व कागदपत्रांची छाननी करुन नामनिर्देशन झालेले आहे. त्यावेळेला भारतीय जनता पक्षाने थोडा अवधी मागून घेतला होता

आणि तो अवधी आयुक्तांनी दिला आणि आम्ही सुध्दा सर्वच गटनेत्यांनी त्याला मान्यता दिलेली होती. त्यानंतर रितसर मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार सर्व गटनेत्यांनी त्याला मान्यता दिलेली आहे. हा विषय त्या पध्दतीने आलेला आहे. याच्यामध्ये अनियमीतता वाटत असेलतर आमच्या वतीने मा.आयुक्त यांनी छाननी करुन हा विषय आमच्या समोर ठेवलेला असल्यामुळे हा विषय आता आहे तसा मंजूर करावा ज्यांची कोणाची हरकत असेलतर त्यांनी कोर्टामध्ये जाऊन दाद मागावी आणि हा विषय मंजूर करावा अशाप्रकारची विनंती आपल्याला करतो.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर मा.योगेश भाईनी जी सूचना केली त्याला मी अनुमोदन देतो हा विषय मंजूर करुन पाचही नामनिर्देशीत सदस्यांना सभागृहात आमंत्रीत करावे.

**मा.महापौर-** विषय क्रमांक १० मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर -** पाच नामनिर्देशीत सदस्यांना व सभागृहाच्या वतीने विशेष अतिथी म्हणून मा.अमर साबळे, खासदार यांना सभागृहात आमंत्रीत करण्यात येत आहे.

(पाच नामनिर्देशित सदस्य व मा.अमर साबळे, खासदार सभागृहामध्ये आले)

(मा.महापौर, मा.खासदार, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.सभापती-स्थायी समिती, मा.सर्व पक्षाचे गटनेते व मा.पदाधिकारी यांच्या हास्ते नवनिर्वाचित पाच नामनिर्देशित सदस्यांचा सत्कार करणेत आला.)

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- २५ विषय क्रमांक – ११

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र. प्रशा/२/कावि/२१३/२०१७
दिनांक- १९ /०५/२०१७
२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र. प्रशा/२/कावि/२१२/२०१७
दिनांक- १९ /०५/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत एकूण ०६ प्रभाग समित्या स्थापन करण्यात आल्या असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ (अ) मधील

तरतूदीनुसार नव्याने ०२ प्रभाग समित्या निर्माण करण्यास मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ९, दिनांक २०/०४/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापी सदरची मान्यता देताना ०२ नविन प्रभाग समित्यांचे कामकाजाकरीता आवश्यक असलेले वर्ग १ ते ४ च्या संवर्गातील पदनिर्मितीस मंजुरी देण्यात आलेली नाही. ती देणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेमध्ये उपरोक्त अधिनियमातील तरतूद विचारात घेता लोकसंख्येच्या प्रमाणात व अधिनियमातील तरतूदीनुसार निर्माण करण्यात आलेल्या ०२ नविन प्रभाग कार्यालयांकरीता क्षेत्रिय अधिका-यांसह, इतर वर्ग १ ते ४ चे संवर्गातील विविध अभिनामाची आवश्यक पदे निर्माण करून त्याप्रमाणे आकृतिंबध निश्चित करून शासन मंजुरीकरीता पाठविण्यास व याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सारिका बो-हाडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६
३) मा.महापालिका ठ.क्र.९११ दि. २९/८/२०१६
४) मा.महापालिका ठ.क्र.९२६ दि. २८/११/२०१६
५) मा.महापालिका ठ.क्र.९६१ दि. २२/१२/२०१६
६) मा.महापालिका ठ.क्र.११ दि. २०/०४/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.१/१३३ यामध्ये शाळेचे आरक्षण एकुण क्षेत्र १८००० चौ.मी. आहे. या क्षेत्रापैकी ४७५४ चौ.मी. क्षेत्र हे महानगरपालिकेने FSI/TDR बदल्यात ताब्यात घेतले आहे. उर्वरीत क्षेत्राचा ताबा सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांचेकडे आहे. आरक्षणाचे संपुर्ण क्षेत्र माध्यमिक शाळा आरक्षण तरतुदीन्वये विकसित करणेसाठी महानगरपालिकेच्या ताब्यातील ४७५४ चौ.मी. जागा जागेसाठी नगररचना विभागाने

ठरविलेल्या दरानुसार ३० वर्ष कालावधीसाठी ई-निविदा नोटीस क्र.१/२०१६-१७ अन्वये दर मागविणेत आले होते. (निविदा रक्कम रुपये २,५१,४८,६६०/-) सदर कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांची एकमेव निविदा पात्र ठरली असून त्यांनी सदरकामी निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% जास्त असा दर सादर केला आहे. सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे या निविदाधारकांची निविदा निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त रक्कम रुपये २,५२,७४,४०३/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी बावन्न लाख चौ-याहत्तर हजार चारशे तीन फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्ष कालावधीसाठी लीज दराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.उषा मुंढे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रियंका बारसे –** मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्राथमिक शाळेसाठी महानगरपालिकेने ठेवलेला आरक्षीत प्लॉट हा निश्चितच कौतूकास्पद विषय आहे. कारण हा आरक्षीत प्लॉट चिखलीवासीयांसाठी एक वरदान आहे. पण विषयपत्रीकेतील विषय पाहीलातर त्यात असंदिग्धतता दिसून येते. माध्यमिक शाळेचे आरक्षण मनपाने पुर्ण ताब्यात घेणे आवश्यक होते. कारण मनपाने १८००० चौ.मी. एवढ आरक्षण याठिकाणी टाकलेले आहे आणि आता आरक्षणाचा विषय हा फक्त ४७५४ चौ.मी. हा आपल्या समोर येतो. नगररचना विभागाने हा पुर्ण प्लॉट त्यावेळेला ताब्यात का घेतला नाही याचे नगररचना विभागाने स्पष्टीकरण करावे. त्याचप्रमाणे शिक्षण विभागाने एक वर्षे शाळा सुरु करण्याचे नियोजन नाही असा अभिप्राय दि.२७/१०/२०१५ ला दिलेला आहे. बांधा, वापरा व हस्तांतरीत करा अशाप्रकारच्या कोणत्या प्रकारच्या अटी/शर्ती त्यांनी संस्थेला टाकलेल्या आहेत याचा खुलासा करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यांनी संस्थेची तपासणी केलेली आहे का. तपासणीसाठी सस्थेचे कोणते पात्रता, निकष ठेवलेले आहेत याचा खुलासा करणे आवश्यक आहे. त्या शिवाय निवीदेला दोन वेळा मुदतवाढ देणे आवश्यक होत परंतु ही मुदतवाढ एकदाच देऊन तीन पैकी एकच संस्था पात्र असल्याचे आणि त्याच्यावर पाकीट क्रमांक २ फक्त उघडण्यात आलं. मुळ अर्ज सुभद्राज् एज्यूकेशनचा आहे. ११९०० चा जो भाग राहीलेला आहे तोही आदि सुभद्राजच्या ताब्यात होता, आताचा जो भाग आहे ४७५४ चौ.मी. या भागासाठी आता निवीदा दाखल केलेली आहे व ती सुध्दा सुभद्राज् यांचीच आहे. पहील्या निवीदेच्या वेळी एकच पाकीट पात्र ठरलेले आहे तेही सुभद्राजचे त्यामुळे हे संशयास्पद वाटते त्यामुळे या मुद्दयाची आयुक्त साहेबांनी तपासणी करुन या प्रक्रीयेमध्ये जे अधिकारीवर्ग आहेत त्यांची चौकशी करावी अशी मागणी करते. हा विषय चुकीचा आणि अपुर्ण माहितीच्या आधारे आला आहे म्हणून हा फेटाळण्यात यावा असे सांगते, धन्यवाद.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. चिखली प्र.क्र. २ या प्रभागामध्ये आरक्षण क्र.१/१३३ हा विषय या सभागृहामध्ये कमीत कमी पाच ते सातवी वेळ

आहे की सभागृहामध्ये हा विषय येत आहे. त्या विषयामागे कोण, काय दडलेलं आहे. आज हा विषय या सभागृहामध्ये येत असताना ज्यावेळेला आपण मंजूर विकास आराखडयाचे काम केले त्यावेळेला त्याठिकाणी माध्यमिक शाळेचे आरक्षण त्या जागेवर टाकले. त्यावेळेला त्याठिकाणी देखील शेतकरीच होते. कोणतीही शालेय संस्थेची जागा नव्हती किंवा कोणत्याही बिल्डरची जागा नव्हती. गोरगरीब शेतक-यांच्या जागेवर पिंपरी चिंचवड महापालिकेनी आरक्षण टाकलेले आहे त्यामुळे आमच्या सारख्या शेतक-यांवर अन्याय करुन त्याठिकाणी आरक्षण टाकलेले आहे. ती जागा ४७५४ चौ.मी. ताब्यात घेतलेली आहे आणि बाकीची १३२४६ चौ.मी. जागा सुभद्राज या संस्थेनी शेतक-यांकडून घेतलेली आहे. जर ते आरक्षण आपण त्याठिकाणी टाकलेले आहे त्याठिकाणी पिंपरी चिंचवड महापालिका माध्यमिक स्कुल बांधु शकत नव्हती का. त्याठिकाणी आमच्या भागात त्याची आवश्यकता नाही का हा खुलासा झाला पाहीजे. कारण प्रत्येकवेळी १८ ते २० वर्षे झाले जे जे सदस्य ग्रामीण भागातून निवडून आलेले आहेत ते काहीतरी अपेक्षेने याठिकाणी आलेले आहेत. त्यांनी मागणी केलेली आहे की आमच्या भागामध्ये चांगली शाळा, इमारती झाल्या पाहीजेत. आमच्या भागातील विदयार्थी देखील शिकले पाहीजेत परंतु आज २० वर्षानी सांगायला खेद वाटतो की पिंपरी चिंचवड महापालिकेची आमची कुदळवाडीची शाळा आजही जिल्हापरिषदेच्या जुन्या खोल्यामध्ये विदयार्थी बसतात त्यांना बसण्यासाठी इमारत नाही. आजचे वर्तमानपत्र पाहीलेतर त्यामध्ये असे आहे की दिड वर्षापासून त्या इमारतीचे काम चालू आहे. आमचा जुना प्रभाग क्र.५ कुदळवाडी-जाधववाडी त्यावेळेला त्यावेळी तत्कालीन महापौर मा.शकुंतलाताई धराडे आणि आदरणीय आमदार महेशदादा लांडगे यांच्या शुभहास्ते त्याठिकाणी भुमीपुजन झालेले होते. आम्हांला निधी कमी पडला. निधी कमी पडल्यामुळे ते काम बंद पडले. येणा-या बजेटमध्ये आपण तरतूद केली ते काम निधी उपलब्ध झाल्यास चालू होईल. परंतु ज्या अपेक्षेनी आमची गाव या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केली त्या पध्दतीने या गावचा विकास म्हणावा असा झालेला नाही. जे आरक्षण याच भुमीपुत्रांसाठी ठेवलेले आहेत ते या गावातील मुल शिकले पाहीजेत. त्याच धरतीवर तुम्ही त्याठिकाणी आरक्षण टाकली परंतु त्या मागे बरेचसे काही वेगळे घडत चाललेल आहे. आरक्षण टाकताय पण त्याठिकाणी रोडचा टिडीआर झाला पाहीजे. त्याठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिका अशा शाळा करु शकते. आमच्या मुलांसाठी इमारत उभी करुन शाळा चालू केली पाहीजे. आज सातवी पर्यंत आमची शाळा आहे. ब-याचशा ठिकाणी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सातवीपर्यंत शाळा आहेत. आम्ही शिक्षणमंडळ, आयुक्तांना पत्रव्यवहार केलेला आहे की आमच्याकडे आठवी ते दहावी पर्यंत शाळा सुरु करावी त्याचा आजपर्यंत कधी विचार करण्यात आला नाही, तो विषय कधी सभागृहात आला नाही. परंतु असा विषय कोणाला न पटणारा विषय सभागृहात येत असेलतर ही अत्यंत खेदाची बाब आहे त्यामुळे मा.महापौर साहेब आपण सुध्दा ग्रामीण भागातील आहात, आपल्याला सुध्दा न्याय मिळालेला आहे त्याच पध्दतीचा

न्याय येणा-या काळामध्ये या ग्रामीण भागात दिला पाहीजे. या विषयाला आमचा शंभर टक्के विरोध आहे. ज्या ज्या वेळेस हा विषय सभागृहात येतो त्यावेळेस नगरसदस्यांकडे तीरक्या नजरेनी पाहीले जाते की हा विषय सभागृहामध्ये प्रत्येकवेळी कसा येतो. त्यामुळे हा विषय फेटाळून लावावा. पुन्हा हा विषय सभागृहात आला नाही पाहीजे. कारण की, करुन जातो एक आणि नाव येतं एकाच त्यामुळे असले विषय सभागृहात आले नाही पाहीजे. जी जागा शिल्लक आहे ज्या शिक्षण संस्थेची जागा आहे ती सुध्दा महापालिकेनी घ्यावी आणि आमच्या या शहरासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेची तिथं माध्यमिक शाळेची इमारत बांधावी अशी विनंती करतो. आजपर्यंत जी समाविष्ट गाव आहेत त्याठिकाणी किती माध्यमिक शाळा आहेत आणि किती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आणि जिल्हापरिषदेच्या शाळा आहेत हे पाहणे गरजेचे आहे. आयुक्त साहेबांना काल आमच्या सदस्यांनी पत्र दिलेले आहे की बो-हाडेवाडीची शाळा मोडकळीस आलेली आहे त्याचा विचार होणं हे देखील तेवढच गरजेच आहे. कारण त्या शाळेत देखील जे विदयार्थी बसतात ते सुध्दा विदयार्थी गोरगरीबांचेच बसतात. तेथे बसणारे मुल कोणत्या मोठया व्यक्तींची मुल नाहीत. यामध्ये ती शाळा सुध्दा दुरुस्त होणे आवश्यक आहे. त्याठिकाणी जे आरक्षण आहे तेथे ती इमारत होणे तेवढच गरजेचे आहे. जिल्हापरिषदेची रुम आजपर्यंत त्याठिकाणी आहे ती बदलणे आवश्यक आहे. यावर लवकरात लवकर कारवाई करावी. मी अशी मागणी करतो की ग्रामीण भागातील आणि या शहरातील ज्या ज्या मोडकळीस आलेल्या इमारती आहेत त्या लवकरच नव्याने झाल्या पाहीजेत अशी मागणी करतो. कुदळवाडी शाळा, बो-हाडेवाडी शाळा असेल शहरातील अन्य शाळा असतील त्याचा विचार करणे आवश्यक आहे. हा विषय कायमचा फेटाळण्यात यावा अशी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय पोटतीडकीने राहूल जाधव यांनी सांगीतला आहे. ग्रामीण भागातील गोरगरीबांची मुल शाळेमध्ये जातात. आपण आरक्षण टाकत असताना, सुभद्राज एज्युकेशनलचे आरक्षण डेव्हलप करत असतानाच या गोष्टीचा विचार व्हायला पाहीजे होता. त्यांनी ही जागा टिडीआर बदल्यात घेतली. आपण विरोधाला विरोध, नुकसान/फायदा याचा विचार सुध्दा सभागृहाने करावा. आपण या ठिकाणी भाडे काय ठरवले, त्याठिकाणी महापालिका शाळा बांधु शकते का नाही. त्याठिकाणी असलेली लोकसंख्या, विदयार्थी याचा विचार केला पाहीजे. वाकडसारख्या ठिकाणी भुसंपादन केले, कोर्टात गेले त्याठिकाणी तुम्ही शाळेचे काम सुध्दा चालू केले. आज नऊ नऊ वर्षे त्याठिकाणी जिल्हापरिषदेच्या ताब्यात शाळा चालू आहे. अशा गोष्टी असताना प्रायव्हेट एज्यूकेशनल संस्थेला का जागा देता. सारखा सारखा हा विषय सभागृहात येतो. हा विषय येत असताना महापालिकेच्या शाळेत कोण शिकते, कोणते विदयार्थी शिकतात. या विदयार्थ्यांना चांगल्या शाळेची गरज आहे तरच त्यांना पुढे चांगले संस्कार मिळतील. आज आपण विदयार्थ्यांना

चांगल्या सुविधा देत असताना हा विषय मंजूर करावा किंवा करु नका. परंतु जो निर्णय याठिकाणी घ्यायचा आहे तो शहरातील विदयार्थ्यांच्या हिताचा घ्यावा. ग्रामीण भागाची शाळा आहे. आज नऊ नऊ वर्षे ताथवडेच्या शाळेच काम करुन घेत नाहीत. लिगल डिपार्टमेंट काय करतं. संपुर्ण शहरातील एज्युकेशन का कोलमडले हे बघावे. महापालिकेच्या शाळेत शिकणा-या मुलांना संस्काराची आणि शिक्षणाची गरज आहे. स्वत:च्या प्लॉटमध्ये देखील आम्ही शाळा केल्या आहेत. चांगले इन्फ्रास्ट्रक्चर, चांगल्या शाळा, चांगल्या सुविधा या शहरातील मुलांना दयाव्यात अशी विनंती करतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राहूल जाधव आणि बारसेताईनी विषय मांडला. यामध्ये सुभद्राज् इन्टरनॅशनल स्कूल यांना तीस वर्षे भूखंड लीजवर दयायचा विषय चार वेळा हा ठराव फेटाळलेला आहे. पाचव्यावेळा हा ठराव याठिकाणी आलेला आहे. याच्यामध्ये काहीतरी गैरव्यवहार आहे असे सांगीतले. याचा संबंधित अधिका-यांनी पुर्णपणे खुलासा करावा आणि हा विषय दसरी दाखल करावा त्या अगोदर खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचे मित्र जाधव यांनी प्रस्ताव मांडलेला आहे की हा विषय फेटाळावा म्हणून तसेच आमच्या नवीन भगीनी आहेत त्यांनी सुध्दा अभ्यासपुर्ण विषय मांडलेला आहे. माझी दोन्ही सभासदांना विनंती आहे की तुमच्या निर्णयाला माझा विरोध नाही. माझ आपल्याला म्हणन असं आहे की, आपल्या भगीनीताई पहील्यांदा सभागृहात निवडून आलेल्या आहेत, आमचे मित्र जाधव यांची दुसरी टर्म आहे. एकूण १८००० चौ.मी. आरक्षण त्या जागेवर होतं. जाधव यांच्या आदिचे नगरसेवक असतील, जाधव असतील, त्या काळचे अधिकारी असतील, त्या काळच शिक्षणमंडळ, शिक्षण समिती असेल या लोकांना त्या जागेची आवश्यकता का वाटली नाही. किंवा एखादा टिडीआर देण्या अधि आपण शिक्षणमंडळाकडून एनओसी घेतो सदर जागेची तुम्हांला आवश्यकता आहे का, नाही असे विचारल जात. एनओसी मिळाल्यानंतर आयुक्तांकडे, टीडीआर कमिटीकडे प्रस्ताव जातो व नंतर तो प्रस्ताव मान्य होतो. वास्तविक पाहता अशाप्रकारचे आरक्षण पडत असताना मालक एकच असतो अशातला भाग नाही. या साडेचार एक्करामध्ये कदाचित चार ते पाच मालक असु शकतात. एका-दोन मालकानी जागा रिटर्न केली बाकीच्या मालकानी जागा विकून टाकली आणि जेव्हा त्यांनी ती जागा टिडीआरच्या मोबदल्यात विकली त्यावेळेला ती सुभद्राज एज्युकेशनलने विकत घेतली. सुभद्राज एज्युकेशनलची ती जागा विकत घेतल्यानंतर आता १८००० पैकी साधारणत: १३२४६ चौ.फु.ही जागा आता प्रायव्हेट मालकीची आहे आणि आपण आता वादविवाद करतो, जी काही मागणी करतो, त्या गावक-यांच्या मुलांबद्दल आपण बोलतो त्याठिकाणी जागा फक्त तुमच्या हातामध्ये राहते ती ४७५४ चौ.मी. आहे. ५१ हजार फुटाची जागा फक्त शिल्लक राहते. त्यातूनही या प्लॉटचे दोन तुकडे होतात माझ्या माहितीप्रमाणे

त्यातून रस्ता जातो. असे असेलतर आपल्या महापालिकेकडे डेव्हलपमेंट करण्यासाठी जी शाळा असणार आहे ती नेमकी किती राहणार आहे याचा विचार त्यावेळेला आयुक्तांनी, नगररचना विभागाने केलेला असेल, त्या संस्थेनी मागणी करताना केलेला आहे. हा सादकबाधक विचार झाल्यानंतरच हा विषय सभागृहापुढे आला. वास्तविक पाहता त्या सुभद्राज एज्युकेशनशी आम्हांला काही घेणे-देणे नाही. हा विषय होत असताना मी सांगु इच्छितो की आज आपल्या महापालिकेच्या शाळेची अवस्था काय आहे ती बघा. त्या त्या वर्गातील पटसंख्या किती त्याची आयुक्त साहेब तुम्ही माहिती घ्यावी. हाळू हाळू गळती लागलेली आहे. शेंडगेताई शिक्षीका आहेत त्या चांगली माहिती देऊ शकतील. महानगरपालिकेच्या शाळेची पटसंख्या कमी झालेली आहे. अनेक तुकडया शासनाच्या नियमाप्रमाणे गेलेतर त्या तुकडया बंद कराव्या लागतील अशा परिस्थितीत आहे. एका बाजूला आपण चांगल आणि उत्तम शिक्षण देण्याच बोलतो आणि दुस-या बाजूला सेमी इंग्रजी चालू करायची म्हणतो आणि तीस-या बाजूला पालकांचा आणि लोकांचा कल हा इंग्रजी माध्यमाकडे आहे. जो उठसुठ आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमात टाकतो आणि ही काळाची गरज आहे मी त्यांना नाव ठेवू इच्छितच नाही. माझ्या माहितीप्रमाणे आमचे मित्र जाधव यांचे मोठे बंधु त्यांची दोन-तीन मुल आहेत ती सुध्दा सुभद्राज एज्युकेशनलमध्ये शिकतात आणि ते इग्लीश मेडीयममध्येच शिकतात हे आता आमचे सन्मा.सदस्य येथे बोलतात. ते शिकतात म्हणजे वाईट करतात अशातला भाग नाही. ते फि भरतात, अनुदान भरतात सगळ करतात. परंतु गावक-यांची मागणी काय याचा विचार आमच्या भगीणीनी आणि जाधव यांनी करावा. त्या ५१ हजार फुटामध्ये महापालिकेला किती जागा राहणार. मुलांना खेळायला जागा राहणार आहे का, आपल्याला ती शाळा बांधता येणार आहे का, आपल्याला चांगली शाळा एक हजार फुटामध्ये बांधता येत असेलतर निश्चितच बांधावी मराठी मेडीयमची बांधावी त्यांना हवी तशी बांधावी किंवा ती सेमी इंग्लीश बांधावी या गोष्टीसाठी आमचा विरोध नाही. माझी विनंती एवढीच आहे की तुम्हांला विषय दप्तरी दाखल करायचा असेलतर त्यालाही माझा विरोध नाही परंतु जर तुम्हांला या निवीदा पुन्हा काढायच्या असतीलतर पुन्हा काढा. परंतु ती शाळा जी आहे ती त्या जमिनीचे सध्या दोन तुकडे झालेले आहे. ८० टक्के भाग प्रायव्हेट संस्थेनी घेतलेला आहे व २० टक्केचा तुकडा तुमच्या हातामध्ये राहीलेला आहे, अशा परिस्थितीमध्ये आपण नेमका काय निर्णय घ्यावा याचा विचार आपण करावा. जाधव तुम्ही तुमच्या गावक-यांशी, त्या संबंधिताशी चर्चा करावी, त्या संस्थेशी चर्चा करा. नसेलतर पुन्हा निवीदा काढावी. आता एका बाजुला ८० टक्के जागा ही प्रायव्हेट मालकाची झालेली आहे आणि २० टक्के महापालिकेच्या हातामध्ये आहे. आशा परिस्थितीमध्ये आपण साधकबाधक चर्चा करुन निर्णय घ्यावा एवढीच विनंती करायची आहे. अन्यत: माझा यामध्ये व्यक्तीश: काही स्वार्थ नाही आपल्याला विषय दप्तरी दाखल करायचा असेल किंवा फेटाळायचा असेलतर फेटाळू शकता, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर याविषयी आमच्या भगीनी बारसेताई आणि राहूल जाधव, राहूल कलाटे यांनी चांगले मार्गदर्शन केले. महापालिकेच्या हद्दीमध्ये राहणा-या सर्वसामान्य माणसाच्या मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहीजे, खरंतर हा चांगला हेतू आहे. अशा पध्दतीचा प्रयत्न आमचाही निश्चितच आहे. महापालिकेमध्ये आम्ही सत्तेत आल्यानंतर पहील्यांदा जी झोपडपट्टीमध्ये राहणारी माणस असतील, मुल असतील त्यांना चांगल्या पध्दतीचे शिक्षण मिळाले पाहीजे. ही जागा किती आहे, साडेचार एक्कर आहे का सव्वा गुंठयाची आहे हा मुळातच प्रश्न नाही. या विषयाचे डॉकेट मागच्या जीबीला आले होते. त्याच्या आगोदर तीन ते चार वेळा विषय तहकूब केलेला आहे. एखादा विषय एवढया वेळा तहकूब का होतो त्याच्या बद्दल शंका असण्याचे कारण आहे. त्या भागातील रेट बघीतलातर मला असं वाटत की पाच ते दहा लाखापेक्षा पुढचा, याच्यापेक्षातर कमी निश्चितच रेट नाही. एक एक स्क्वे.फुटाचे पैसे महापालिकेच्या तीजोरीमध्ये आले पाहीजेत अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. शाळेमध्ये चांगले शिक्षण मिळाले पाहीजे हे सगळयांनाच वाटतय, मला असं वाटतय की महापालिकेच्या एवढया शाळा आहेत, राहूल दादाच्या भावाची असेल किंवा आमच्या भगिनींची जरी मुल या शाळेत शिकत असलीतरी मला असे वाटतय की आपण जर महापालिकेच्या शाळेचा दर्जा मागच्या काळात चांगला केला असतातर, महापालिकेच्या ज्या शाळा आहेत त्याच्यामधुन जर आपण इंग्रजी माध्यमाचे शिक्षण दिले असतेतर मला वाटते प्रायव्हेट शाळा याठिकाणी वाढल्या नसत्या. ही जर परिस्थिती बदलायची असेलतर मला असं वाटतय की जेवढी जागा असेल त्या जागेमध्ये त्या भागातील नागरीकांना ज्या ज्या फॅसिलीटीची गरज असेल तशा पध्दतीच्या इमारती पुढच्या काळात बांधली जाऊ शकते. दोन्ही सदस्यांनी ज्या पध्दतीने आपले मत व्यक्त केले, या शाळेच्या एकंदरीत निवीदा प्रक्रीयेत थोडीशी शंका आहे आणि मला असं वाटतय की शंका ज्या गोष्टीची असते त्याचे निरसन निश्चित झाले पाहीजे. नगररचना यांनी विषय डायरेक्ट कशा पध्दतीने नेला. हा विषय फेटाळून या विषयाची सखोल चौकशी झाली पाहीजे आणि ज्या अधिका-यांनी यामध्ये निवीदा प्रक्रियेमध्ये घोटाळा केला असेल, गडबड केली असेल त्याची चौकशी करुन हा विषय दप्तरी दाखल करावा. पुन्हा आपल्याला वाटले चांगली एखादी शाळा निवीदा प्रक्रीयेमध्ये आलीतर त्यांना चांगला उपयोग होईल. तरी विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करुन या विषयाची सखोल चौकशी करावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नागदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- २६ विषय क्रमांक – २

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.९११ दि. २९/८/२०१६

४) मा.महापालिका ठ.क्र.९२६ दि. २८/११/२०१६

५) मा.महापालिका ठ.क्र.९६१ दि. २२/१२/२०१६

६) मा.महापालिका ठ.क्र.११ दि. २०/०४/२०१७

विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.योगीता नागरगोजे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- २७ विषय क्रमांक – ३

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/०५/कावि/३९/२०१७ दि.७/३/२०१७

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२३१ दि.१९/४/२०१७

प्रस्तावात नमूद प्रमाणे अमृत योजना या लेखाशिर्षाकरीता सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकात र.रू.४० कोटी तरतूद केलेली असून माहिती व तंत्रज्ञान विभागाने २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक र.र.२४ कोटी ३५ लाख रकमेचे लेखा विभागाकडे सादर केलेले आहे. सबब र.रू.४० कोटी मधील र.रू.१५ कोटी तसेच सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकात कर्ज निवारण निधी या लेखाशिर्षावर र.रू.५ कोटी तरतूद केलेली असून त्यातून र.र.३ कोटी ५० लाख वर्ग करून अशा प्रकारे एकूण ४५ कोटी रूपये नगररचना विभागाकडे भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वर्ग करण्यात आलेले आहेत. मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक लेखा/०६/कावि/२७२३/२०१७ दिनांक २४/१/२०१७ अन्वये सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात र.रू.४५,००,००,०००/- (अक्षरी र.रू. पंचेचाळीस कोटी फक्त) नगररचना व विकास विभागाकडील

"भूसंपादन निधी" या लेखाशिर्षावर वर्ग करणेत आलेले असल्याने रकमेविषयीचे प्रतिवृत्त अवलोकन करणेत येत आहे.

**मा.माधवी राजापुरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.माया बारणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- २८ विषय क्रमांक – ४

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/२२/कावि/१२/२०१७ दि.१०/३/२०१७

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२६७ दि.३/५/२०१७

वृक्ष संवर्धन विभागाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१७-१८ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे. मा.वृक्ष प्राधिकरणांने सभा ठराव क्र.१४ दिनांक २८/११/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सन २०१६-२०१७ च्या ६ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ६ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कम नमूद केलेल्या आहेत. सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१७,६८,९१,०००/- चे व सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.१७,६१,५६,०००/- यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.संगिता भोंडवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- २९ विषय क्रमांक – ५

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
मातंवि/१२/कावि/९०/१७ दि.१०/०४/२०१७
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ६ दि.२०/४/२०१७

केंद्र शासनाचे स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे दि. ३१ मार्च २०१७ रोजी सादर करणेत आलेल्या शहराचे स्मार्ट सिटी प्रपोजलसाठी कार्योत्तर मान्यता मिळणे. तसेच, मंजुर प्रपोजलचे अनुषंगाने सदर अभियानांतर्गत राज्य स्तरीय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करणेत आलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविणेकरिता विशेष उद्देश वहन (SPV-Special Purpose Vehicle) स्थापन करणे आणि त्याअनुषंगाने अभियानाच्या वित्तिय आकृतीबंधानुसार महापालिकेचा स्व:हिस्सा उभा करणेचे (तरतुद करणेचे) अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एसपीव्ही बद्दल या सभागृहाला माहिती दयावी. १२८ नगरसेवकांपैकी ९२ नगरसेवक हे नवीन आहेत. एसपीव्ही ही कोणाच्यासाठी गाडी आहे, नेमकी महापौरांसाठी गाडी आहे का, आयुक्तांसाठी गाडी आहे, का कच-याची गाडी आहे का इतर कुठली कमिटी आहे याची माहिती दयावी. मी नवीन नगरसदस्य आहे माझी इच्छा आहे की स्मार्ट सिटी आणि त्याला अनुषंगून जी काही कमिटी स्थापन करणार आहेत याच्याबद्दल माहिती दयावी आणि ही अशाप्रकारची पहीली कमिटी इतर देशामध्ये स्थापन केली होती का आणि त्याचे रिझल्ट काय आहेत याच्या बद्दल खुलासा करावा.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. केंद्रशासनाने स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत एसपीव्ही आणि इतर गोष्टीचा सामावेश करुन आताच आमच्या सहकार्यानी विचारणा केल्याप्रमाणे या स्मार्ट सिटीत पिंपरी चिंचवड शहर निवडले त्याचे निकष काय होते, कशा पध्दतीने ते निवडले त्याची माहिती आपण कोणाकोणाला दिली. हे जे शहर आहे पिंपळेसौदागर हे शहर निवडलेले आहे ते निवडताना आपण काय निकष लावले आणि तेच का निवडले गेले. आमच्या माहितीप्रमाणे जे शहर आपण निवडलेलं आहे ते निवडताना आपण काय निकष लावलेले आहेत. एसपीव्ही स्थापन करणार त्याचे अधिकार काय असणार. कोणाचा

त्याच्यामध्ये समावेश असणार. महापालिकेचा किती हिस्सा, केंद्राचा किती हिस्सा असणार. काम करण्याची काय प्रणाली असणार त्याची माहिती सभागृहात दयावी अशी विनंती करतो.

**मा.शत्रूघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्मार्ट सिटी अंतर्गत पिंपळेसौदागर का निवडल्या गेलं असा विषय योगेश भाईनी याठिकाणी मांडला. सात टर्म पासून योगेशभाई या सभागृहाच नेतृत्व करतात, अतीशय हुशार आहेत. नदीच्या पलीकडचा भाग जर पाहीलातर जी काही डेव्हलपमेंट आतापर्यंत त्या भागामध्ये झाली त्यामध्ये पिंपळेसौदागर, पिंपळेगुरव, वाकड, रावेत, पुनावळे त्या भागात जास्त निधी आतापर्यंत आलेला नाही. त्या भागामध्ये ज्यावेळेला स्मार्ट सिटीचे व्होटींग झालं त्यामध्ये ४५ हजार व्होटींग त्याठिकाणी झालेले आहे. त्यासाठी पिंपळेसौदागर, पिपळेगुरव, वाकडची निवड करण्यात आली. योगेश भाईना माहिती नसेल कारण दोन महीन्यापुर्वी आपल्या भागामध्ये प्रत्येक ठिकाणी फॉर्म वाटले होते. बरेचसे नगरसेवक नवीन आहेत त्यांना माहित नसेल, तुषार कामठे याठिकाणी आहेत मला वाटत पिंपळेनिलख मधुन १२ हजार व्होटींग झालेले आहे. तुम्ही विरोध केला नाही, स्पेशल पिंपळेसौदागरचा उल्लेख केला, हे पिंपळेसौदागर आमच्या सांगण्यावरुन घेतल नाहीतर तेथील नागरीकांनी व्होटींग केलेले आहे. स्मार्टसिटीमध्ये असे बरेचसे प्रभाग येणार आहेत. योगेशभाई बोलले म्हणून मला बोलणं भाग पडल, धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. योगेश बहल यांनी सांगीतल्याप्रमाणे एसपीव्ही अंतर्गत काय येणार, कशाप्रकारे स्थापना झाल्यानंतर ही संस्था काम करेल. मला कळल नाही की योगेश बहल यांच्या प्रश्नाला अधिका-यांने उत्तर दयायचतर शत्रूघनने का दिल. मलाही पोमण साहेबांनी सांगीतल पिंपळेसौदागर आणि पिंपळेगुरवच घेतलं. जो निकष लावला तो संपुर्ण सभागृहाला कळला पाहीजे. सर्व नागरीकांना याचा कशाप्रकारे लाभ होईल आणि कशा प्रकारे ही संस्था काम करेल हे सभागृहाला निश्चित कळल पाहीजे याची माहीती दयावी.

**मा.महापौर-** संबंधित अधिका-यांनी या विषयी माहिती दयावी.

**मा.निलकंठ पोमण (माहिती व तंत्रज्ञान अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.स्मार्ट सिटी जे आहे ते केंद्रशासनाचे अभियान आहे. त्याची घोषणा मा.पंतप्रधान महोदयांनी दि. २५ जुन २००५ रोजी करण्यात आलेली होती. सदर अभियानात सहभाग घेण्यापुर्वी महापालिका सभा ठ.क्र.७१७ दि.२०/७/२००० रोजी मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्याअनुषंगाने महापालिकेनी राज्यशासनास दि. २८/५/२०१५ रोजी प्रस्ताव सादर केलेला होता. राज्यशासनाने या योजनेसाठी महाराष्ट्र राज्यातील १० शहराची निवड केलेली होती. त्यामध्ये पिंपरी चिंचवड शहराचा समावेश पुणे शहरा बरोबर एकत्रीतपणे ३१ जुलै २०१५ रोजी करण्यात आलेला होता. त्यानंतर ऑगष्ट २०१५ चे कालावधीमध्ये केंद्रशासनाचे १०० स्मार्ट सिटीची यादी जाहीर केली त्यामध्ये फक्त पुणे शहराचा समावेश झाला, पिंपरी चिंचवड शहराचा

समावेश झालेला नव्हता. यानंतर दि. ३०/१२/२०१६ रोजी केंद्रशासनाचे नगरविकास विभागाकडून नवी मुंबई ऐवजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश करण्यात आले बाबत कळविले व त्याची प्रत महापालिकेस २ जानेवारी २०१७ रोजी प्राप्त झाली. या पत्राबरोबर त्यांनी हे देखील कळवल होतं की हा केंद्रशासनाचा शेवटचा राऊंड आहे. ३१ मार्च २०१७ पर्यंत प्रस्ताव राज्यशासना पर्यंत पाठविण्याची अंतीम मुदत दिलेली होती. त्यानंतर ७ जानेवारीला आपली आचारसंहिता सार्वजनिक निवडणूकीची सुरु झाली. तरी देखील यासाठी आपण स्मार्ट सिटी प्रपोजल करण्यासाठी कैंद्राच्या ज्या शॉर्टलीस्ट केलेल्या संस्था होत्या त्याचा आपण प्रस्ताव मागीतला. सुरवातीला महाराष्ट्रासाठी ज्या ११ संस्था शॉर्टलीस्ट केल्या होत्या त्या संस्थामधुन आपल्याला एकच प्रस्ताव आला. त्यानंतर दुस-यांदा मुदतवाढ देवुन ११ ज्या ऑल इंडीया लेव्हलच्या संस्था होत्या त्यांच्या मार्फत आपण प्रस्ताव मागीतला तीन प्रस्ताव आले. त्याठिकाणी स्मार्ट सिटी प्रापोजल तयार करणारे क्रिसील या संस्थेची नेमणूक केली. त्यानंतर २१ फेब्रूवारीला निवडणूक होती, २३ फेब्रूवारीला मतमोजणी होती, आचारसंहिता कालावधीमध्ये कोणतीही प्रक्रीया करण्यात आलेली नाही. २७ फेब्रूवारी ते १५ मार्च या काळात जे कन्सल्टेशन्स असंत त्याच्यामध्ये सामाजीक संस्था आहेत, अनेक एनजीओ आहेत यांचे आपण कन्सलटेशन घेतले तर जवळ जवळ १७ संस्थेचे कन्सल्टेशन्स करण्यात आले. यासाठी आपण शहरातील नागरीकांचा सहभाग यासाठी डीसीएम नावाची संस्था नेमली होती. त्या संस्थेनी शहरातील जे नागरीक आहेत, शाळा आहेत, कॉलेज आहेत याठिकाणी फॉर्म वाटप करुन ते भरुन आलेले होते. त्यानंतर ४ मार्च २०१७ रोजी यासाठी वेबसाईट लॉन्च केली होती त्यामध्ये आलेले फिडबॅक आहेत. १५ मार्च पर्यंत आपण वेबसाईड ठेवली होती त्याची मुदत २७ मार्च पर्यंत वाढविण्यात आलेली होती. ऑनलाईन वेबसाईट देखील तयार केलेली होती, डीसीएम संस्थेनी देखील माहिती घेतलेली होती, सगळया शाळा कॉलेजकडून आपल्याला अर्ज प्राप्त झाले, सोशल मेडीयामार्फत, फेसबुक आहे, ट्विटर आहे, बल्क एसएमएस मार्फत आपण अवेरनेस केलेला होता. कैंद्रशासनाचे जे निकष आहेत त्याच्यामध्ये ऐरीया ५०० एकर ते २००० एक्कर याप्रमाणे ऐरीयाची निवड करणे गरज होत. आपल्याला त्याठिकाणी २५३५८४ नागरीकांचे फिडबॅक प्राप्त झालेले आहेत. याच्यामध्ये सर्वात जास्त २० टक्के वाकड, पिंपळेसौदागर ऐरीयाला आहे. त्यानंतर दुस-या नंबरला निगडी प्राधिकरण आहे. तीस-या नंबरला सांगवी ऐरीया त्यामध्ये आलेला आहे. या कामाकाजासाठी स्मार्टसिटी एसपीव्ही तयार करणे त्याचा शासन निर्णय ९ जानेवारी २०१७ रोजी राज्यशासनाने शासन पारीत केलेला असून त्याच्यामध्ये १५ संचालक असतात. त्याचे अध्यक्ष मा.नितीन करीर साहेब आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी संचालक ६ आहेत. महाराष्ट्र शासनाचे ४ संचालक आहेत., कैंद्रशासनाचे एक संचालक आहेत. कैंद्रीय कंपनी व्यवहार मंत्रालय आहे त्यांची यादी आहे त्याच्यातून दोन संचालक निवडायचे असतात, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त हे एक संचालक आहेत.

यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी एक असे टोटल १५ संचालक आहेत. महापालिकेसाठी बोर्ड ऑफ डायरेक्टर सहा आहेत त्याच्यामध्ये मा.महापौर, मा.अध्यक्ष स्थायी समिती, मा.सभागृहनेते, मा.विरोधीपक्षनेते हे सुध्दा संचालक आहेत. याच्या व्यतिरीक्त दोन संचालकाची निवड करावयाची आहे. या व्यतिरीक्त इतर राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त पक्षाचे याठिकाणी निवड करायची आहे. एसपीव्ही स्वतंत्र कंपनी ज्यावेळेस अंमलात येईल त्यावेळेस त्याचा जो निधी आहे त्या निधीमध्ये केंद्रशासनाचे आपल्याला ५०० कोटी प्राप्त होणार आहेत, राज्यशासनाचे आपल्याला २५० कोटी प्राप्त होणार आहेत व महापालिकेचा स्वहिस्सा २५० कोटीचा आहे. अशी ही १ हजार कोटीची एसपीव्ही कंपनी मार्फत तरतूद आहे. याच्या व्यतिरीक्त एसपीव्हीला स्वत:चा निधी उभारणे हे देखील त्यामध्ये तरतूद आहे. हा जरी आपण ऐरीयाबेस पिंपळेसौदागर, पिंपळेगुरव केलेला असलातरी टप्याटप्याने आपल्या शहराचे जे दुसरे भाग आहेत त्या दुस-या टप्प्याचा देखील याठिकाणी पाच वर्षाच्या काळात विचार करण्यात येणार आहे. त्यासाठी एसपीव्हीला याठिकाणी मान्यता मिळावी त्यासाठी प्रस्ताव मा.महापालिका सभे समोर मांडलेला आहे. महापालिकेचा स्वत:चा हिस्सा २५० कोटी त्याची तरतूद करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना असतील असा प्रस्ताव मांडलेला आहे. यास महापालिकेची मान्यता मिळावी अशी विनंती करण्यात येत आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पोमण साहेबांनी पुन्हा एकदा माहिती दयावी. त्यानी असे सांगीतले की प्रथम क्रमांकाचे मतदान जे तीन गाव आहेत ते परत वाचून दाखवावे. दुसरा विषय असा आहे की या स्मार्ट सिटीमध्ये कोणकोणते काम प्राधान्याने घेतली जाणार आहेत त्याची माहिती दयावी. केंद्रशासनाचे ५०० कोटी, राज्यशासनाचे २५० कोटी व आपले २५० कोटी असे एक हजार कोटीची माहिती दिलेली आहे. प्रथम क्रमांकाचे व्होटींग कोणत्या ऐरीयामध्ये झालेले आहे ते नाव सांगा आणि यामध्ये कोणते काम प्राधान्याने घेतली जातील याची पण माहिती सांगा.

**मा.निलकंठ पोमण** **(माहिती व तंत्रज्ञान अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर यांच्या परवानगीने खुलासा करतो. याठिकाणी जो सन्मा.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याचा खुलासा करतो की, आपल्याला जे व्होटींग झालेले आहे त्याच्यामध्ये आपली वेबसाईड सुध्दा होती. त्याच्यामध्ये आपण डीसीएफ ही संस्था नियुक्त केलेली होती. दोनप्रकारे फॉर्म देखील भरुन आलेले आहेत. आपल्या वेबसाईडवर देखील माहिती आलेली आहे. आपल्याला जी डेडलाईन केंद्रशासनाने राज्यशासनाला आपण जो प्रस्ताव सादर करायचा ती ३१ मार्च २०१७ पर्यंत केंद्रशासनाकडे पोहचायला पाहीजे अशी लिमीट होती. त्यामुळे जो कालावधी आपल्याला मिळाला त्या कालावधीमध्ये आपल्याला २ लाख ५३ हजार ५४८ प्राप्त झालेले आहे त्याची मी आपल्याला थोडक्यात माहिती देतो. यामध्ये जे वाकड, पिंपळेसौदागर आहे त्या ऐरीयासाठी ५०७१० एवढे आपल्याला रिस्पॉन्स प्राप्त झालेले आहेत.

निगडी प्राधिकरण ऐरीयासाठी ३५४९७ प्राप्त झाले आहेत. सांगवी ऐरीया साठी ३२९६१ प्राप्त झाले आहेत. पिंपरी चिंचवड स्टेशन ऐरीया यासाठी ३२९६१ प्राप्त झाले आहेत. आकुर्डी रेल्वेस्टेशन ऐरीयासाठी ३२२३३ प्राप्त झाले आहेत, स्पाईनरोडसाठी २०२८४ प्राप्त झाले आहेत, भोसरीसाठी १७७४८ प्राप्त झाले आहेत, चिखलीसाठी १५२१३ प्राप्त झाले आहेत, मोशीसाठी १२७७७ आणि शहराच्या इतर भागासाठी २५३५ प्राप्त झाले आहेत. याच्यामध्ये हा निधी कशाप्रकारे, कोणकोणते काम घेतले जाणार याची माहिती सांगतो. याच्यामध्ये दोन भाग आहेत. ऐरीया बेस डेव्हलपमेंट आणि दुसरा जो आहे त्याला पॅनसिटी असं म्हणल जातं. आपण ऐरीया बेस डेव्हलपमेंटसाठी जो निधी आहे तो ५६५.४ कोटी आहेत, पॅन सिटीसाठी ५२९.१ कोटी आहे. याच्यामध्ये संबंधित एचओडी, जे टेक्निकल काम करतात त्यांच्यासाठी ऐरीया बेस डेव्हलपमेंट यासाठी जे कांपोनन्ट याच्यामध्ये सिलेक्ट केलेले आहेत त्याच्यासाठी सुरवातीला जो स्ट्रिट डेव्हलपमेंट आहे, रोड डेव्हलपमेंट आहे त्यासाठी ९२.८ इतके केलेले आहे. कन्स्ट्रक्शन ऑफ पार्कसाठी, प्लेग्राऊंड आहेत, मेजर पार्क आहेत असे वेगवेगळे दिले आहे त्यासाठी ५८ कोटी घेतलेले आहेत. नंतर इन्टरनल रोड कनेक्टेट सिस्टीम असते त्या ऐरीयाची त्याच्यामध्ये स्ट्रॉर्मवॉटर, सिव्हरेज, रिसायकलींग वॉटर, सोलर पॉवर जनरेशन, कम्युनिटी डेव्हलप याच्यासाठी ५३ कोटी. कनेक्टेड पिपल म्हणून कन्सेप्ट आहे यासाठी हॉकर्स झोन, रेट्रोफिकेशन, पब्लिक टॉयलेट यासाठी निधी आहे असा मिळून ५६५.४ कोटीचा निधी आहे. दुसरा जो प्रकार आहे त्याला पॅनसीटी म्हणल जातं, पॅनसिटी ही कन्सेप्ट संपुर्ण शहरासाठी आहे आणि त्यासाठी ५२०.९ कोटी प्रोव्हीजन ठेवलेले आहे. त्याच्यामध्ये संपुर्ण आयटी रिलेटेड ज्या गोष्टी असतात, इन्टेलीजन्ट गोष्टी असतात त्याचा आपण उल्लेख केलेला आहे. त्याच्यामध्ये इंटेलीजन्स हा जो पार्ट आहे त्यासाठी जी तरतूद केलेली त्याच्यामध्ये स्मार्ट वॉटर, स्मार्ट सिव्हरेज आहे, स्मार्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट आहे, स्मार्ट स्ट्रिट लाईट आहे. दुसरा जो भाग आहे त्याला कम्युनिकेशन म्हणल जातं. त्याचेमध्ये ऑप्टीकल फायबर आहे, टेली कम्युनिकेशन आहे. तीसरा भागामध्ये रिस्पॉन्स म्हणल जातं. कमान्न्ड कंट्रोल सेल्टअप ते एकत्रीत कराव लागतं. नंतर म्युनिसीपल सर्व्हिस लेव्हल बेंच मार्कीगच्यासाठी आपण ठेवलेल आहे. ऍडव्होटाईज ऍण्ड कंट्रोलसाठी आपण ठेवलेल आहे. पब्लिक वाय-फाय हॉटस्पॉट आहेत, ट्रान्सपोर्ट हा सैक्शन आहे त्याच्यामध्ये स्मार्ट पार्कीग आहे, बायसीकल सिस्टीम आहे, मोबाईल ऍप आहे त्याची सुध्दा याठिकाणी सुविधा निर्माण केलेली आहे. असा हा आपला पॅनसिटीचा कन्सेप्ट आहे. त्यात सोशल मिडीया आहे, शाळेसाठी म्युनिसीपल क्लासरुम आहे. सभागृहास विनंती करण्यात येते की केंद्रशासनाकडून या संदर्भात मे किंवा जुनच्या पहील्या आठवडयात जी शेवटची शहर आलेली आहेत त्याचेमध्ये नामांकन होईल, पिंपरी चिंचवडच सुध्दा त्याच्यामध्ये नामांकन होणार आहे. त्याच्यामुळे हा विषय मंजूर करण्यात यावा अशी विनंती करण्यात येते.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता तुम्ही आकडेवारी सांगीतलेली आहे. फॉर्म दिलेल्यावरुन आकडेवारी आहे का. सोशल मिडीयावरुन आलेली आकडेवारी आहे.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्या पालिकेचा विकास किंवा विचार झाला तो पिंपरी चिंचवड महापालिका. पिंपरी पासून झाला. आमचे दुमत नाही, गुरवपिंपळे असेल, सांगवी असेल, वाकड असेल. पण ऑनलाईनमध्ये आमच्या पिंपरी मधले सगळी येडीगबाळी आहेत. आता ही सुरवात आहे. पिंपळेगुरव, पिंपळेसौदागरमध्ये जाऊ दया. सांगवीत जाऊ दया, वाकडमध्ये जाऊ दया त्याठिकाणी सगळे माझे मित्र, बंधु भगिनी सगळे नातेवाईक आहेत परंतु आमच्या पिंपरीसाठी कधी नंबर लागेल एवढ तरी सांगीतलतर बरे होईल. आमची पिंपरी २५ ते ३० वर्षे झाले व्हेन्टीलेटरवरती आहे. तीला आता खर बाहेर काढायच आहे. तरी आमच्या पिंपरीचा नंबर लवकरात लवकर लावावा अशी विंनती करतो आणि थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्मार्ट सिटीसाठी एसपीव्ही स्थापन करण्याच्या संदर्भात खरेतर पोमण साहेबांनी चांगली माहिती सभागृहासमोर दिलेली आहे. योगेश बहल यांनी खुप चांगल्या सुचना दिलेल्या आहेत. स्मार्ट सिटीमध्ये पहील्यांदा अशी परिस्थिती झाली की केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार आल आहे. ज्यावेळेला पहील्यांदा स्मार्ट सिटीमध्ये या शहराचा समावेश झाला नव्हता, शहरात मोठया प्रमाणात राजकारण झाले आणि त्यावेळी दुस-या फेजमध्ये या शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश होईल. आम्ही जे बोलतो ते करणार असे आमचे केंद्र आणि राज्यातील सरकार आहे. पिंपळेसौदागर, पिंपळेगुरव या सगळया शहराला स्मार्ट करायचे, एकच प्रभाग स्मार्ट करायचा नाही. अजून आपल्या शहरात मुलभूत सुविधेचा वानवा आहे. हे करायचे असेलतर या प्रक्रीयेला खुप विलंब झालेला आहे. मी मा.महापौर साहेबांना विनंती करतो की एसपीव्हीची स्थापना करुन शहर ख-या अर्थाने स्मार्ट होण्याच्या दिशेन आपण मुंबई, दिल्ली, शांघाय या शहराचा विचार करतो मला वाटत की त्याच्याही पुढे पिंपरी चिंचवड शहर नेण्याचे काम आपल्याला करायचे आहे हा विषय मंजूर करावा, धन्यवाद.

**मा.निलकंठ पोमण** **(माहिती व तंत्रज्ञान अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सन्मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करतो. जी माहिती मागविलेली होती त्याच्यामध्ये ऑनलाईन वेबपोर्टल तयार केलेले होतं. त्या वेबपोर्टलमध्ये ऑनलाईननी माहिती आपण घेत होतो. त्याच्याबरोबर शाळेतून, कॉलेजमधुन फॉर्म सर्क्यूलेट केलेले होते. त्याच्यामुळे अशी आपल्याकडे वर्गवारी प्राप्त नाही. आपण हे सर्व टोटल एकाच कामासाठी तयार केलेले होतं. सर्वांसाठी ओपन केलेल होतं आणि जो आलेला रिझल्ट आहे तो कागदही एकत्रीत केलेला आहे.

**मा.महापौर-** हा विषय क्र. ५ मंजूर करणेत येत आहे परंतु आयुक्त साहेबांना विंनती आहे की आपण या प्रकल्पासाठी मतदान घेतलेले आहे, मी महापौर या नात्याने आपल्याला सांगतो की याची खरोखरच जाहीरात झालेली नाही. तसातर प्रभाग हा माझाच घेण्यासारखा होता. पंतप्रधान आवास योजना यासंदर्भातही सांगतो की ती योजना नगरसेवकांना आम्हांला विश्वासात घेवूनच नंतर ही योजना जाहीर करायला हवी होती, विषय सोडून बोललो माफ करा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ६

दिनांक – १९/५/२०१७ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. स्था/बीआरटीएस/१६/२०१७ दि.११/०४/२०१७

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ७ दि.२०/४/२०१७

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील खालील १ ते ४ हे मुख्य रस्ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले आहेत असे पत्र क्र.रेशा/४४३३/सन २०१७ दि.७/३/२०१७ चे कार्यकारी अभियंता सा.बा. (दक्षिण) विभाग, पुणे १ यांनी कळविले आहे. अ.क्र. ५ व ६ अदयाप महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले नाही.

१. मुंबई-पुणे रस्ता (Old NH-4) भक्ती शक्ती निगडी ते हॅरीस ब्रीज दापोडी
२. औंध-रावेत रस्ता (Old NH-4) मुकाई चौक रावेत ते सांगवी फाटा राजीव गांधी पुल
३. देहू-आळंदी रस्ता (SH-116)
४. दिघी (पुणे)-आळंदी रस्ता (SH-129)
५. नाशिक फाटा ते मोशी इंद्रायणी नदीपर्यंतचा रस्ता (NH-50)
६. किवळे-मामुर्डी ते वाकड मुळा नदीवरील पुलापर्यंत (पश्चिम बाहय वळण मार्ग) (NH-4)

वरील ६ रस्त्यांपैकी अ.क्र.१ ते ४ या मनपा हद्दीतून जाणारे राष्ट्रीय महामार्ग (NH-4) व राज्य मार्ग यांची देखभाल दुरुस्ती,विकसन व सुधारणा कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहेत. अ.क्र. ५ व ६ हे रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतर करणेत आलेले नसल्यामुळे यांची देखभाल दुरुस्ती, विकसन व सुधारणा कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत नाहीत. सबब,

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मनपा हद्दीमधून जाणारे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग De-Notification करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वर्तमानपत्रामध्ये माहिती आलेली होती. विषय मागे घेतल्याबद्दल धन्यवाद त्याबद्दल आमचा विरोध नाही. आयुक्त साहेबांनी राज्यशासनाला या संदर्भात पत्र लिहीलेले आहे त्या पत्राची माहिती सभागृहाला व्हावी अशी माझी विनंती आहे. या विषया संदर्भात अर्बन डेव्हलपमेंटने मध्ये डिक्लेअर केलेले होते. अर्बन डेव्हलपमेंटने डिक्लेअर केल्यानंतर सदरचे अधिकार मा.आयुक्तांना दिलेले होते. अधिकार जरी मा.आयुक्तांचे असलेतरी राज्यकर्ते भारतीय जनता पार्टी आहे. हे लोकांना ज्ञात व्हावे. मा.आयुक्त यांनी शासनाला काय पत्र लिहीलेले आहे याची माहिती आम्हांला कळवावी.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कावि/बीआरटीएस/१३४/२०१७ दि.१२/०५/२०१७ चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमांक ६ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.सारीका सस्ते -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.महापौर -** विषय क्रमांक ६ प्रशासनाने मागे घेण्याची विनंती केलेली आहे त्यानुसार विषय क्रमांक ६ मागे घेण्यास परवानगी देणेत येत आहे. संबंधित अधिका-यांनी याची माहिती दयावी.

**मा.राजन पाटील (सह शहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यासंबंधी मा.आयुक्त साहेब यांचे मार्फत मुख्य अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ यांना यासंबंधीचे पत्र दि.१२/०५/२०१७ रोजी दिलेले आहे ते पुढीलप्रमाणे- सार्वजनिक बांधकाम विभागाकडील खालील अनुक्रमे १ ते ४ हे मुख्य रस्ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले आहेत असे पत्र क्र. रेशा/४४३३/सन २०१७ दि.७/३/२०१७ चे कार्यकारी अभियंता सा.बां.(दक्षिण) विभाग, पुणे १ यांनी कळविले आहे. अ.क्र.५ व ६ अदयाप महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले नाही. १) मुंबई-पुणे रस्ता (Old NH-4) भक्ती शक्ती निगडी ते हॅरीस ब्रीज दापोडी २) औंध-रावेत रस्ता (Old NH-4) मुकाई चौक रावेत ते सांगवी फाटा राजीव गांधी पुल ३) देहू-आळंदी रस्ता (SH-116) ४) दिघी (पुणे)-आळंदी रस्ता (SH-129) ५) नाशिक फाटा ते मोशी इंद्रायणी नदीपर्यंतचा रस्ता (NH-50) ६) किवळे-मामुर्डी ते वाकड मुळा नदीवरील पुलापर्यंत (पश्चिम बाहय वळण मार्ग) (NH-4).

वरील ६ रस्त्यांपैकी अ.क्र. १ ते ४ या मनपा हद्दीतून जाणारे राष्ट्रीय महामार्ग (NH-4) व राज्य मार्ग यांची देखभाल दुरुस्ती, विकसन व सुधारणा कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहेत. अ.क्र. ५ व ६ हे रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतर करणेत आलेले नसल्यामुळे

यांची देखभाल दुरुस्ती, विकसन व सुधारणा कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत नाहीत. महापालिका हद्दीतून जाणा-या या राज्य/राष्ट्रीय महामार्ग अवर्गीकरण (De-Notification) करणेबाबतचा प्रस्ताव माहे एप्रिल २०१७ च्या मा.महापालिका सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. माहे एप्रिलच्या महापालिका सभेमध्ये हा विषय मा.महापालिका सभा माहे मे २०१७ मध्ये घेण्याचा निर्णयानुसार मा.महापालिका सभा कार्यपत्रिका क्रमांक ३ विषय क्रमांक ६ अन्वये प्रस्तावित आहे. विषयांकित बाबत मा.जिल्हाधिकारी यांचे दालनात दि. २९/३/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या सभावृत्तांतामध्ये महापालिकेच्या कार्यक्षेत्रातून जाणारे राज्य व राष्ट्रीय महामार्ग अवर्गीकृत (De-Notification) करणेची कार्यवाही महापालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी करावी असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि , महापालिकेस राज्य/राष्ट्रीय महामार्गचे वर्गीकरण (नामकरण) अथवा अवर्गीकरण (De-Notification) करण्याचे मुलभूत अधिकार नसून असे अधिकार केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग/राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे असल्यामुळे विषयांकित बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांना संदर्भिय क्रमांक ३ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अवर्गीकरण (De-Notification) करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे कळविलेले आहे.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ३० — विषय क्रमांक – ६

दिनांक – १९/५/२०१७ — विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.
स्था/बीआरटीएस/१६/२०१७ दि.११/०४/२०१७
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ७ दि.२०/४/२०१७

मा.आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कावि/बीआरटीएस/१३४/२०१७ दि.१२/०५/२०१७ चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमांक ६ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ — प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उषा ढोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.उदयान/३/कावि/३५३/२०१७ दि.१७/०४/२०१७

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 व सुधारित नियम 2009 सह शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्र.शहव 1004/प्र.क. 137/नवि-20 दिनांक 24 नोव्हेंबर 2005, शासन अधिसूचना नगरविकास विभाग क्र.टीपीबी 4395/45/प्र.क्र.22/भाग-4/95 नवि-11 दिनांक 31 नोव्हेंबर-1996 अन्वये प्रकरण दोन 3 (1) नुसार वृक्षाधिकरणाची स्थापना करणे आवश्यक आहे.

महापालिकेची सन-2017 मध्ये सार्वत्रिक निवडणुक झालेली असुन नव्याने वृक्षप्राधिकरणाची रचना/ स्थापना उक्त अधिनियम प्रकरण 2 कलम 3 (1) अन्वये नव्याने वृक्षप्राधिकरण गठीत करणे आवश्यक आहे.

सदर अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (1) अन्वये नागरीक्षेत्रात हा अधिनियम अमलात आणल्यानंतर शक्य तितक्या लवकर नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यामधून ते प्राधिकरण ठरवील अशारितीने व अशा मुदतीत नेमणेत आलेल्या, (अध्यक्ष व इतर यांसह) कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 व्यक्तीचे मिळून बनलेले वृक्षप्राधिकरण गठीत करील. सदर अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (2) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष हे मा.महापालिका आयुक्त हे असतील.सदर अधिनियमातील प्रकरण 3 कलम 5 (1) अन्वये आपल्या एका किंवा अधिक अधिका-यांची या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वृक्षअधिकारी म्हणुन नेमणूक करील. व हा अधिकारी सहाय्यक नगरपालिका आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही.

सदर अधिनियमातील प्रकरण 3 कलम 5 (1) अन्वये मुख्य उदयान अधिक्षक यांना वृक्षअधिकारी म्हणुन नेमणूक करणेस व अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (2) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष मा.आयुक्त असतात.व त्याच्यासह कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्य मिळून वृक्षप्राधिकरणाची रचना केली जाते. त्यासाठी महापालिका सदस्यांमधून अध्यक्षांसह कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्य संख्या असलेली समिती गठीत करावयाची आहे. तरी वृक्षअधिकारी व वृक्षप्राधिकरण सदस्यांची नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाच्या अनुषंगाने अधिनियमातील प्रकरण ३ कलम ५ (१) अन्वये मुख्य उदयान अधिक्षक यांना वृक्ष अधिकारी म्हणून नेमणुक करणेस व अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (2) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष मा.आयुक्तांसह कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १४ सदस्य याला आपल्याला मान्यता दयायची आहे. वास्तविक पाहता याठिकाणी या विषयामध्ये उदयान विभागाने व्यवस्थित खुलासा केला असता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ३१ अ प्रमाणे जसे सदस्य संख्या बलाप्रमाणे करतो त्याप्रमाणे तपशिलवार माहिती दिली असतीतर हा विषय मंजूर करण्यास अवघड नव्हते. प्रत्येक पक्षाच्या संख्याबला प्रमाणे मुंबई महापालिका अधिनियम ३१ अ प्रमाणे किती सदस्य नेमता येतील. भारतीय जनता पार्टी बहुमतामध्ये असल्याने त्यांनी सांगावे. ५ ठेवावे का १४ ठेवायचे. ५ ठेवायचे असतीलतर त्यांच्या संख्याबळाप्रमाणे इतरांना किती मिळतील आणि १४ ठेवायचे असतीलतर संख्याबळाप्रमाणे किती मिळतील. त्यादृष्टिने पुढच्या मिटींगमध्ये हा विषय ठेवलातर नाव देता येईल आणि तसा विषय ठेवता येईल अशी आमची सूचना आहे.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. योगेश बहल यांची सुचना बरोबर आहे. याच्यामध्ये महापालिका अधिनियमाप्रमाणे पक्षीय बलाबल प्रमाणे निश्चितच केल गेले नाही. सगळया पक्षाच्या लोकांना प्रतिनीधीत्व शंभर टक्के दिल पाहीजे. विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक – ७
दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.उदयान/३/कावि/३५३/२०१७ दि.१७/०४/२०१७

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३२ विषय क्रमांक – ८
दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्वभाअक/३/कावि/२४/२०१७ दि.६/०५/२०१७

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/४/२०१७अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

प्रपत्र "अ"

| **महानगरपालिकेचेनाव** | | **पिंपरीचिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १०३३३ | |
| केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ९०४२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ५७५४ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | ४७७३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ४३२० | |

| | | | |
|---|---|---|---|
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १७५सीटस | महिला – ९४ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष – ८१ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ५०८४लाभार्थी | GOI+GOM=३०५.०४ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB =१०१.६८ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४०६.७२लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ३३४६लाभार्थी | GOI+GOM=२००.७६ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB =६६.९२ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२६७.६८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.शैलजा मोरे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मीनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचा प्रभाग क्र. १४ महात्मा फुले नगर झोपडपट्टीवासीयांनी पश्चिम महाराष्ट्र अभियानाअंतर्गत स्वतंत्र शौचालयाचा अनेक जणांनी लाभ घेतलेला आहे. परंतु या कामाच्या अंतर्गत ड्रेनेजलाईन पिण्याच्या पाण्याच्या लाईनच्या तेथून टाकलेली आहे, यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहेत. तरी मी आपल्या विनंती करते की पावसाळयाच्या तोंडावर या ड्रेनेजच्यालाईन व्यवस्थित करण्यास सांगाव्यात. त्याची व्यवस्थित पाहणी करावी की या लाईन नेमक्या पिण्याच्या पाण्याच्या लाईन मधुनतर जात नाहीत नां. असे प्रकार त्याठिकाणी भरपूर झालेले आहेत त्याचा त्रास लोकांना होतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ३३ विषय क्रमांक – ९

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. जा.क्रमांक/पापु/क – इ/कावि/६६/२०१७. दि. ६/०५/२०१७.

मा. मुख्यधिकारी यांनी ३।५।२०१७ चे पत्रान्वये चिखली, जाधववाडी व कुदळवाडी इत्यादी भागातून कारखान्यातील मैला व रसायन मिश्रीत पाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदीमध्ये नाल्याद्वारे सोडले जाते व त्यामुळे इंद्रायणी नदीपात्रातील पाणी दुषित व पिण्यास अयोग्य होत आहे. तसेच आळंदी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख तिर्थक्षेत्र असून येथे दररोज व महिन्याची एकादशी, लग्न या दिवशी हजारोंचे संख्येने व आषाढी व कार्तिकी या दोन मोठ्या यात्रे दरम्यान लाखोंचे संख्येने भाविक, भक्त वारकरी आळंदी येथे येतात व इंद्रायणीचे पाणी तीर्थ म्हणून प्राशन करीत असतात. यामुळे पिण्याच्या पाण्याचा बाका प्रसंग निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी यात्रा काळात पिंपरी चिंचवड म.न.पा. कडून आळंदी शहराला सालाबादप्रमाणे पाणी पुरवठा होत असतो. त्याच पाईप लाईनमधुन आळंदी शहरास (अंदाजित १महिना) निःशुल्क पाणीपुरवठा करण्यात यावे असे कळविलेले आहे.

आळंदी नगर परिषदेस पिंपरी चिंचवड म.न.पा. कडुन आषाढी व कार्तिकी वारीसाठी सुमारे ७ दिवस दररोज ५० हजार लिटर याप्रमाणे र.रु. २.५० प्रति १ हजार लिटर या दराने शुल्क आकारुन पाणी देण्यात येते वरील बाबींचा विचार करता सुमारे अंदाजे १ महिना या कालवधीकरीता र.रु. २.५० प्रति १ हजार लिटर निवासी दराने दिवसाआड २ लाख लिटर इतका पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे. तरी आळंदी नगरपालिकेस दिवसआड २ लाख लिटर पाणी पुरवठा चालू केला असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय सभागृहात आलेला आहे. तीर्थक्षेत्रासाठी विषय चांगला आहे. पण तीर्थक्षेत्राला जे काही आज भोगाव लागत आहे ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या काही भागामुळे किंवा त्याठिकाणी भंगारचे दुकान असतील याठिकाणचे दुषीत पाणी त्याठिकाणी जाते. गेल्या ब-याच वर्षापासून आम्ही हा विषय या सभागृहामध्ये मांडत आहोत. आपले नैसर्गीक नाले, आहेत ओढे आहेत त्यामध्ये केमीकल मिश्रीत पाणी सर्व इंद्रायणीनदी मध्ये जाते. पर्यावरण विभागाने समक्ष पाहणी करुन आम्ही समक्ष निदर्शनास आणून दिलेले आहे. याठिकाणी केमीकल मिश्रीत पाणी, प्लॅस्टिकचे पोते त्या पाण्यात धुतले जातात आणि तेच पाणी इंद्रायणीमध्ये जाते. एक महीन्यापुर्वी मी कुलकर्णी

साहेबांशी चर्चा केलेली होती की आपण जे पर्यावरण विभागास बजेट ठेवतो त्यामध्ये इंद्रायणी नदी स्वच्छ करणे गरजेचे आहे. परंतु त्यावेळी देखील आपण इंद्रायणी स्वच्छ करण्यासाठी तरतूद नाही असे उत्तर आलेले आहे. परंतु मला एवढेच सांगायचे आहे की ही जी वेळ आलेली आहे यावर आपण मात केली पाहीजे. तळवडे, चिखली, जाधववाडी, कुदळवाडी, मोशी याठिकाणी जे रासायनीक मिश्रीत पाणी जाते त्यामुळे इंद्रायणी दुषीत झालेली आहे. आपण देखील ग्रामीण भागाचे आहात त्यामुळे गेल्या पंधरा वर्षाचा ईतीहास पाहीलातर इंद्रायणीचे पाणी त्या भागातील सर्व लोक पीत होते परंतु आजची परिस्थिती खुप अवघड आहे. त्यामुळे येणा-या काळामध्ये जर काही असे निर्णय आपल्याला करावे लागतात त्यासाठी इंद्रायणी असेल, पवना असेल या नदया स्वच्छ झाल्या पाहीजेत. त्यासाठी योग्य निर्णय घ्यावा एवढीच विनंती करतो, धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ११ एप्रिल २०१७ ला कुलकर्णी साहेब यांना मी पिंपरीमध्ये घेऊन गेलो, इंद्रायणीनदी स्वच्छ झालीच पाहीजेत त्याच्या बरोबर पवना नदीपण स्वच्छ झाली पाहीजे. तेथील परिस्थिती जागेवर दाखविली होती. चार पंपहाऊस डायरेक्ट गटारचे पाणी नदीमध्ये जात होतं. ज्या ठेकेदाराला काम दिलेले होते त्या ठेकेदाराचे माणस तीथं काम करत नाहीत आणि हे कुलकर्णी साहेबांसमोर झालेल आहे. कुलकर्णी साहेबांनी सांगव की ही परिस्थिती कोणामुळे ओढावलेली आहे. महापालिका पैसे खर्च करते मग तुम्ही प्रॉपर आणि प्रॅक्टीकल काम जागेवर करुन का घेत नाहीत. तुम्हांला ते एसटीपी लागतात त्याची तरतूद तुम्ही आजपर्यंत करुन घेतलेली आहे. १२० एमएलडी एसटीपी आपण कासारवाडीला केलेला आहे. पिंपरीमध्ये ३१ एमएलडीच प्रपोजल आहे. ते ओव्हरफ्लो होतं. तुमच कनेक्शन तेथे आहे त्याच्यातून ४० ते ६० एमएलडी वेस्ट होतं. तुम्ही ४७० एमएलडी पाणी पवना धरणातून उचलतातर प्रक्रीया किती पाण्याची करता. इंद्रायणीनदी प्रदुषीत कोणामुळे झालेली आहे. तेथे किती तुमचे पंप होते त्यातले किती एसटीपी तुम्ही आजपर्यंत केलेले आहेत. तुमच्याकडे सगळया गोष्टी अव्हेलेबल असताना ते तुम्ही आजपर्यंत का करु शकला नाहीत. आज तेथे गणपती उत्सव असेल, पिंपरी चिंचवडमध्ये प्रत्येक समाजाचे बांधव राहतात इतर उत्सव असतील. प्रत्येकाची नदी ही जीवनदाहिनी, रक्तवाहीनी आहे. आपण आपल्या नदीला आज आईसारखे मानतो. आपण आपल्या आईला लहान करुन ठेवलेले आहे आयुक्त साहेब तुम्ही ते स्वच्छ कधीपर्यंत करणार. पर्यावरण विभाग आणि इन्व्हारयन्मेंट विभाग आहे त्यांना सक्त ताकीद देवून प्रत्यक्ष कारवाई करुन घ्या आणि कुलकर्णी साहेबांनी उत्तर दयावे अशी विनंती आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापालिका आयुक्तांचे मी मनापासून अभिनंदन करेल. गेल्या अनेक वर्षापासून आळंदीकर आपल्याकडे पाणी मागत होते. आपल्या पापाची फळ आळंदीकराना भोगायला मिळत होती. हा विषय अनेकवेळा

सभागृहामध्ये आलेला होता. या भागामध्ये दुषित पाणी येते त्या पाण्यात इंद्रायणी नदीमध्ये भावीक येत असतात, चांगल्या भावनेने स्नान करण्यासाठी जात असतात. त्या लोकांना इंद्रायणीच्या पवित्र पाण्यामध्ये आंघोळ करतोत का कुठल्या गटरगंगेमध्ये आंघोळ करतो असे त्या नागरीकांना, त्या भावीकांना जाणवत होतं. आज आपले सर्व नाले या नदीला जातात याची खरच पाहणी करण्याची गरज आहे. संदीप वाघेरे यांनी सांगीतलेले बरोबर आहे. पवना आणि इंद्रायणीनदी दुषित होण्यासाठी आपणच कारणीभूत आहोत. आपले प्रशासन या गोष्टीला जबाबदार आहे. इंद्रायणीनदीमध्ये दुषित पाणी जाते. जे आपले प्लॅन्ट आहेत ते च-होलीचा प्लॅन्ट, चिखलीचा प्लॅन्ट अर्धवट आहे त्या प्लॅन्टमुळे इंद्रायणी नदीमध्ये पाणी जाते याला कारणीभूत आपणच आहोत. तळवडेच्या वरच्या भागात सुध्दा संततुकाराम सहकारी साखर कारखाना आहे तिथपर्यंत वेगवेगळया भागातून नाले नदीला आलेले आहेत. हे साहजीकच आहे की नाला हा नदीकडेच वाहीला जातो पण काही नाले चिखलीचा परिसर असेल, तळवडेचा परिसर असेल किंवा च-होलीचा परिसर असेल हे शंभर टक्के ड्रेनेजयुक्त पाणी इंद्रायणीनदीला जाते. प्रशासनास अनेकवेळा सांगीतले च-होलीचा एसटीपी प्लॅन्ट चालू झाला तर हा प्रसंग उदयाच्या काळामध्ये आपल्याला येणार नाही. आपण आळंदीकराना दोन लाख ली. पाणी देण्याचे ठरवले आहे पण आज पिंपरी चिंचवड शहरात एका बाजूला एक दिवसा आड पाणी केलेली आहे आणि दुस-या बाजूने आळंदीकराना पाणी दयायचे तुम्ही सभागृहासमोर आणलेल आहे. आपले पाणी भागऊन आळंदीकराना पाणी देणे शक्य आहे का. आमच्या भागामध्ये आज पाणीपुरवठा सुरळीत नाही. आपल्या घरात लोकांना पाणी आपण व्यवस्थित देऊ शकत नाहीत तर दुस-याच घर बघायला निघालो हा प्रश्न पडलेला आहे. पाणी देण्याबद्दल आमचा अजीबात विरोध नाही कारण ती लोक खरच गटारचे पाणी पितात हे आम्ही पाहीलेल आहे पण आपल्या शहराचा पाणीपुरवठा व्यवस्थित आहे का नाही, आपल्या शहराला पुर्ण पाणी देऊ शकतो का नाही, आपल्याला शहराला पाणी पुरणार आहे की नाही. याच्यापुर्वी पवना धरणामध्ये १८ टिएमसी पाणी असताना सुध्दा त्याकाळात पाणी कपात केलेली होती. आज ३८ ते ४० टक्के पाणी असताना सुध्दा पाणी कपात केलेली आहे. कशासाठी पाणीकपात केलेली आहे. आपण सुध्दा जबाबदारीन उत्तर दिल गेल पाहीजे की आपल्या शहरात पाणीपुरवठयाचा प्रश्न गंभीर असताना सुध्दा आपण शहरातून दुस-या शहराला पाणी देतो. यापुर्वी सुध्दा देण्याचा प्रयत्न केलेला होता त्या लाईन सुध्दा जुन्या आहेत त्या तशाच पडलेल्या आहेत असे असताना सुध्दा यांना किती पाणी देणार आहोत. हे कायमस्वरुपी देणार का, तात्पुरते देणार आहोत का एक महीन्यासाठी दयायचे. एक महीन्यासाठी का दयायच, कायमस्वरुपी का देणार नाहीत. एक महीन्यात ती गटारगंगा बंद होणार का किंवा नाल्याचे पाणी एक महीन्यामध्ये जाणार नाही का ते बंद होणार आहे का. एक महीना पाणी देणार असालतर कायमस्वरुपी पाणी देण्यासाठी काही प्रयत्न केलेले आहेत का हा सुध्दा गांभीर्यांने विचार करण्यासारखा आहे. पावसाळा जवळ

आलेला आहे. ७ जूनला पाऊस येण्याची शक्यता आहे. या शहरातील नालेसफाई कुठेही झालेली नाही, ड्रेनेज साफसफाई झालेली नाही. हा विषय गांभीर्याने घेतला पाहीजे. पावसाळयामध्ये सकल भागामध्ये पाणी जातं त्याठिकाणचे नाले चोकअप आहेत. त्याठिकाणचे नाले, गटर साफसफाई झालेली नाही. मग हे पाप आपण करायच आणि भोगायच ते खालच्या लोकांनी. ही परिस्थिती सुध्दा सुधारण गरजेच आहे. आपल्याला माझी विनंती आहे की ड्रेनेजलाईनचे जे जे पाणी नदीला जाते ते पहीले बंद केले पाहीजे. आपल्या शहराला काय रेटने पाणी घेतो आणि आळंदीला काय रेटने पाणी देतो हे सांगावे. च-होली आणि चिखलीचा प्लॅण्ट लवकरात लवकर चालू केलातर हा उद्भवलेला प्रश्न मिटेल असे वाटते. आळंदीकरांना जो त्रास होतो तो आपल्यामुळे होतो आहे. कुदळवाडीचा जेवढा कचरा आहे, जेवढी ती घाण आहे, केमीकल आहे ते त्या नदीत मिश्रीत होते. त्याठिकाणी आपला कुठलाही अधिकारी जबाबदारीने काम करत नाही. कुलकर्णी साहेब महापालिकेचे जावाई आहेत असे वाटते. अतीशय चांगल्या पध्दतीने ते नगरसेवकांना बोलणार आणि कामाच्या नावाने शीमगा. असे अधिकारी त्याठिकाणी नको, त्या पदावर बसण्याची पात्रता नाही. त्या अधिका-यांना कामाची जबाबदारी नसल्यामुळे असे अधिकारी त्याठिकाणी बसण्याची पात्रता नाही, दुस-या अधिका-यांकडे तो विभाग दयावा. साहेब, तुम्ही परवा चिखली परिसर बघायला आले पण मी विचारतो की तुम्ही कधी कुठला नाला बघायला गेले नाहीत, कधी नदी बघायला गेले नाहीत. कधीही केबीनमधुन ते बाहेर आलेले नाहीत. त्याठिकाणी चांगला अधिकारी पर्यावरणाच्या माध्यमातून दयावा. त्याठिकाणाहून त्यांना काढावे व त्याठिकाणी चांगले काम करणारे अधिकारी दयावे अशी विनंती आहे. शहराचा पाणीपुरवठा आपला किती चालू शकतो एक महीन्यामध्ये त्यांना पाणी देवून आपल्याला काही डिस्टर्ब होणार आहे का हे सांगावे. आपला पाण्याचा रेट आणि त्यांचा पाण्याचा रेट सांगावा.

**मा. सारीका सस्ते -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाण्याचा विषय आहेच पण त्याच बरोबर जलपर्णीचे जे ठेके दिलेले आहेत ते ठेकेदार काय करतात. पावसाबरोबर जलपर्णी वाहून जाण्यासाठी पाऊसाची वाट पाहतात का. याचा खुलासा व्हावा.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी आळंदीकराना पाणी देण्याचा विषय आहे त्याठिकाणी पाणी निश्चितपणे दिले पाहीजे. आपले ते कर्तव्यच आहे आणि किमान तेवढेतरी पुण्य पिंपरी चिंचवडकरांनी कमवलेच पाहीजे. आता दत्तात्रय साने म्हणाले की पाणी दिले पाहीजे. परत म्हणाले की, पाणी पुरते का, पाणी गढूळ आहे, नेमक त्यांचे म्हणणे काय आहे हे कळल नाही. खरंतर आपल्या शेजारच गाव आहे आणि आळंदीमुळ आपल्या शहराची ओळख आहे हेही आपण विसरता कामा नये. आळंदीकरांना पाणी देणे लागतो. राहीला तो प्रश्न आता जलपर्णी आहे का, पाणी गढूळ आहे का नाल्यातुन पाणी तिथं खराब जातय का. या सगळया विषयावर निश्चितपणे काम करण्याची गरज येथून

पुढच्या काळात असलीच पाहीजे. आपण त्यातून वर्कआऊट केलच पाहीजे. येथून मागे काय झाले त्याचा विचार करायचा नाही. परंतु येथून पुढच्या काळामध्ये ज्या पध्दतीने आपण काम करणार आहोत त्यासाठी मात्र आपल्याकडून जे शहरातल पाणी या नदयाला जाऊन मिळतय ते पाणी चांगले जाईल, ड्रेनेजचे पाणी जाणार नाही याची खबरदारी सगळयानी घेतली पाहीजे. जलवाहीनी आहे त्याच्यावर वर्कआऊट करुन ड्रेनेजच्या लाईनमधुन जाणारे पाणी असेल, नाल्यातून जाणारे पाणी, एसटीपी याची पाहणी झाली पाहीजे. आज आळंदीला पाणी निश्चित दयावे. आपली अडचण होणार का, घरातल पोट भरणार आहे का, एक तीळ सात जणांनी वाटून खालला होता ही सुध्दा आपल्या देशाची संस्कृती आहे. तेही विसरता कामा नये त्यामुळे आपली आडचण होईल नाही होईल त्या अडचणीवर आपण सगळेजण मिळून मात करुन आपण आळंदीकरांना पाणी दिले पाहीजे, हा विषय मंजूर करावा.

**मा.प्रज्ञा खानोलकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्या प्रभागामध्ये कॅण्टोन्मेंट बोर्ड आणि महापालिका या दोघांचा समावेश आहे. कॅण्टोन्मेंट बोर्डाचे जे पाणी आहे ते डायरेक्ट थेट पवना नदीमध्ये सोडले जाते ते पवना नदीचे पाणी पिंपरी चिंचवड शहराला सोडले जाते. कॅण्टोन्मेंटचे जे पाणी आहे ते विदाऊट ट्रिटमेंट पाणी पवना नदीला सोडले जाते. त्याच कुठलही सुवेज प्लॅन्टच इन्स्टॉलेशन केल गेलेल नाही. प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी पत्र दयावे जेणेकरुन कॅण्टोन्मेंट बोर्ड ट्रिटमेंट प्लॅन्ट इन्स्टॉल करतील आणि त्यांचे सुवेजच पाणी बंद करतील. जेणेकरुन पवनानदीचे पाणी चांगले राहील आणि पिंपरी चिंचवड शहराला स्वच्छ पाण्याचा पुरवठा होईल. प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी कॅण्टोन्मेंट बोर्डाला पत्र दयावे, धन्यवाद.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आळंदीला २ लाख ली. पाणीपुरवठा करणे म्हणजे त्यांच्या तोंडाला पाणी पुसण्यागत होईल. दोन लाख ली. पाणी म्हणजे एक फ्लॅटला पुरत नाही. आळंदीची लोकसंख्या आणि त्याठिकाणी येणारे भावीक हे लक्षात घेऊन लागेल तेवढा पाणीपुरवठा करावा. तसेच सिध्दीविनायक नगरी कॅण्टोन्मेंट हद्दीमध्ये असणारा भाग आहे त्याला सुध्दा पाणीपुरवठा करावा अशी मी सुचना करतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब याठिकाणी नव्याने आलेले आहेत. तुमचा सत्कार झाला. पिंपरी चिंचवड मध्ये चांगल्या पध्दतीने काम करण्यास तुम्हांला वाव आहे त्यादृष्टिने तुम्ही काम करावे असे मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने सांगते. आजचा जो प्रश्न आहे तो जाधववाडी, चिखली, कुदळवादी हे तीन नाव टाकले असलेतरी सुध्दा ज्या ज्या ठिकाणी नदी आणि कंपनी असेल, उदा. थेरगाव पेपर मीलचे पाणी आम्ही ज्यावेळेला बघीतलेल होत त्यावेळेला पाणी खुप फेसाळलेले होते. त्याठिकाणी नदीतील मासे मेले होते. ज्या ज्या भागामध्ये इन्डस्ट्रीअल आहे, नदी जवळ आहे

त्याठिकाणी रसायनयुक्त पाणी सोडले जाते, त्याचा अधिकार आपल्या महापालिकेला आहे का. चार महीन्यापुर्वी मंत्रालयामध्ये मिटींग होती, त्यावेळेला आम्ही त्यांना विचारल की कॉर्पोरेशनला तुम्ही अधिकार का देत नाहीत. कंपन्या ज्या पाणी सोडतात त्यावेळेस आमच्या महापालिकेचे अधिकारी त्याठिकाणी बोलू शकतात का, जर बोलूच शकत नसतीलतर ते अधिकारी तीथे जाऊन काय करणार. हा अधिकार पहील्यांदा आपण करुन घेतला पाहीजे की जेणेकरुन कोणतेही अधिकारी असो त्याठिकाणी किमंतच देणार नसतीलतर, अधिकार नसतीलतर आपण काय करणार आहोत. मागे मा.रामदास कदम मंत्री महोदयानी स्टेटमेंट केले होते, त्यांनी अहवाल मागविला होता. दोनदा त्याच्यावर त्यांनी सांगीतल की या कंपन्यावर आम्ही प्रतीबंध करु परंतु त्याच्यावर कुठल्याही पध्दतीचा प्रतीबंध झालेला नाही. हे वारंवार घडते आणि आपली नदी प्रदूषित होते. पुढे गेले तर मुळा, मुठा नदया आहेत. त्या इन्डस्ट्रीलअलचे पहील्यांदा ट्रिटमेंट प्लॅन्ट झाले पाहीजे. कुदळवाडीला रात्री माल जाळतात, केमीकल सोडतात त्यासाठी स्वतंत्र प्लॅन्ट केलातर हरकत नाही. त्याच्यामध्ये दंड भरणे, कोर्टाचे ताशेरे ओढून घेण्यापेक्षा आपण आपल्यामध्ये दुरुस्ती करुन घेणं चांगले राहील. इन्डस्ट्रीअलसाठी प्लॅन्ट उभा करायचा असेलतर तो करावा. पाणी कपात करतो त्यावेळेला दुधेकर साहेबांना आदल्या दिवशी आमच्यातल्या एकजणांनी विचारल त्यावेळेला त्यांनी सांगीतल की ४० टक्के पाणी शिल्लक आहे. दुस-या दिवशी मी विचारल त्यावेळेला ३५ टक्के पाणी शिल्लक आहे. आपण पुर्वनियोजन म्हणून एक दिवसाआड पाणी देतो परंतु एकदिवसा आड पाणी देताना सुध्दा मग पुर्ण प्रेशरने दिले पाहीजे. जी टँकर लॉबी आहे पेपरला जे प्रकरण येतात ते कुठेतरी कमी पाहीजेत. हे पाणी दयायला पाहीजे अन्यत: टँकर साठीची मागणी येणारच. कारण जर एखादया सोसायटीमध्ये पाणीच पोहचत नसेल, बारीक पाणी येते त्यामुळे महीलांची भांडणाची परिस्थिती निर्माण होते. माझ्या माहीती प्रमाणे आपल्याकडे पाणी पुरेसे आहे. पाणी जे देणार आहेत ते पुर्ण प्रेशरने दयावे. टँकर लॉबीच पारदर्शक काम करणा-यांनी बघून घ्याव. आमच म्हणण आहे की पिंपरी चिंचवड शहरामध्ये पाणी नागरीकांना चांगले आणि व्यवस्थित मिळाले पाहीजे. स्ट्रॉर्म वॉटर लाईन ओपन गटर्स टाकलेले आहेत. संपुर्ण गटर्सचे ड्रेनेजचे पाणी दिवसाढवळया वाहते. नागरीकांना त्याचा त्रास होतो आम्ही आमच्या अधिका-यांना विचारलेतर आता पाऊस पडतो का नाही पडत मग ओपन याच्यामध्ये तुमच ड्रेनेजच पाणी कसे येते. आज पाऊस पडत नाही मग ओपन गटारमध्ये तुमच ड्रेनेजमध्ये पाणी कसे येते. त्याच्यावर रस्ता खोदून आर्धवट पाईपलाईन टाकलेल्या आहेत. पाणी गळतीवर उपाययोजना केली पाहीजे. ४० टक्के आपली पाणी गळती आहे. एमआयडीसीची एक लाईन आहे. अधिका-यांना आम्ही सांगीतले आहे लोकांना पाणी नाही आणि अक्षरश: ती लाईन धो धो वाहते आहे एमआयडीसी काही करत नाही. नागरीकांच्या मनामध्ये असे येते की ही महापालिकेची लाईन आहे का एमआयडीसी करणार नसेलतर आपण कमीत कमी ती लाईन

दुरुस्त करुन घेतली पाहीजे. संभाजीनगरमध्ये एमआयडीसीची लाईन आहे. त्याच परत धो धो धो पाणी सुरु आहे. याला काय करायच आहे. आळंदीला पाणी न देण्याचा प्रश्न येत नाही. दरवर्षी सालाबादाप्रमाणे आपण त्यांना पाणी देतोच. त्याठिकाणी वारकरी भारतामधुन, परदेशामधुन येतात आणि ते तेथे मुक्कामी असतात. ट्रिट केलेल्या वॉटरची सवय झाली पाहीजे. आपल्याकडे ट्रिटमेंट प्लॅन्ट जिथे आहे तेथे हा प्लॅन्ट टाकला पाहीजे. ट्रिट केलेले पाणी नागरीकांना मिळाले पाहीजे. मग ते गार्डनला मिळाल पाहीजे, माझ्याकडे केले आहे परंतु त्याठिकाणी लाईनला अजून पाणी कनेक्शन जोडलेले नाही. आम्ही नागरीकांना सांगतो सोसायटीच्या गेटमध्ये केलेल आहे तुम्हांला पाहीजेतर तुम्ही आतमध्ये तुमची लाईन करुन घ्या. परंतु ती लाईन अजून कम्प्लेट झालेली नाही. नुसत्या लाईन टाकून झालेल्या आहेत पण पाऊस पडल्यानंतर नागरीक तेच पाणी वापरणार आणि म्हणून प्रत्येक ठिकाणी जिथे ट्रिटमेंट प्लान्ट आहे तीथेच आपला अजून एक प्लान्ट असला पाहीजे. ट्रिट केलेले वॉटर लोकांना मिळाले पाहीजे. पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक गार्डन्गार्डन, डिव्हाडयरमध्ये, फुटपाथमध्ये आपण सुशोभीकरणक केलेले आहे त्याठिकाणी ते सगळ पाणी गेल पाहीजे. आपले पाणी कुठेही वेस्टेज गेले नाही पाहीजे. येथून पुढे सगळया गोष्टीसाठी या उपाययोजना कराव्यात. रेनवॉटर हार्वेस्टींग सुध्दा करायला पाहीजे. राजस्थानमध्ये कधीच पाणी कमी पडत नाही कारण त्याठिकाणी रेनवॉटर हर्वेस्टींग आहे. मोठया स्किमला आपण कम्पलसरी केल पाहीजे. कॉर्पोरेशनचे काही प्रोजेक्ट आहेत या सगळया ठिकाणी तुमचे रेनवॉटर हर्वेस्टींगचे प्रोजेक्ट लागले गेले पाहीजेत. दरवेळेला हा विषय आल्यानंतर आपण म्हणतो की आपल्यामुळे, पण इंद्रायणी नदीला दुषित करणारे लोक दुसरीच असतात त्यांच्यावर लगाम नाही तो लगाम घालण्यासाठी आयुक्त साहेब आपल्याला अधिकार नाहीत ते अधिकार मिळवून आणण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत आणि ते प्रयत्न करावेत. पंधरा दिवसावर पावसाळा आलेला आहे आजून आपले कुठलेही नाले साफ झालेले नाहीत. कोणत्याही नाल्यात जाऊन बघा, प्रचंड प्लॅस्टिक, प्रचंड कचरा नाल्यामध्ये आहे. महापालिकेमध्ये येताना डाव्या बाजूचा नाला बघीतलातर तेथे सुध्दा तीच परिस्थिती आहे. आजुबाजूला वस्ती आहे त्याठिकाणी तुम्ही डस्टबीन आणि मोठमोठे कंटेनर ठेवले पाहीजे. जेणेकरुन लोकांनी त्या नाल्यामध्ये कचरा टाकला नाही पाहीजे. याच्यासाठी ही उपाययोजना जर राबवलीतर मला अस वाटत नाही की नागरीक सुध्दा त्या नाल्यामध्ये प्लॅस्टीक किंवा कचरा वगैरे टाकतील. त्याच प्रमाण कमी होईल. त्यादृष्टिने आपल्याला काम करण्यासाठी सुलभ होईल असे वाटते. पहील्यांदा आयुक्त साहेब आपण प्रयत्न करावा जेणेकरुन कंपनीवर कुठल्याही प्रकारचे बंधन आले पाहीजे की यांनी कुठल्याही प्रकारे पाणी सोडले नाही पाहीजे. तशा सुचना अधिका-यांना दयाव्यात, तुम्ही ताकद दयावी की तुम्ही जा आणि त्या कंपनीस सिल लावून आलं पाहीजे. आपण सोसायटयाच पाणी कनेक्शन तोडतो मग या कंपन्याजर पाणी सोडत असतीलतर कंपन्याना सिल लावायची ताकद आपल्यात

असली पाहीजे आणि ही ताकद निर्माण करुन घेण्याच काम आयुक्त साहेब तुम्हीच कराव अशी मी विनंती करते. आळंदीला पाणी सोडत असालतर पाणी देण्यास विरोध नाही.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेब, आपण त्या दिवशी नव्हतात. मी, सर्व गटनेते होतो. स्थायी समिती अध्यक्ष होते. त्यावेळेला सीओ साहेबीनी जे पत्र लिहीले त्या पत्राच्या अनुषंगाने आयुक्तांनी आम्हांला विनंती केली होती की मी हे सुरु करतो आणि नंतर अवलोकनासाठी हा विषय आणतो. आयुक्तांनी विषय आणून हा विषय मंजूर झालेलाच आहे आयुक्तांनी पाणी देण्यास सुरवात केलेली आहे. हा विषय आपल्याकडे अवलोकनासाठी आलेला आहे. माझी विनंती एवढीच आहे की आता मंगलाताईनी सांगीतल की मा.आयुक्त साहेब, त्यामध्ये तुम्ही, पोल्यूशन कंट्रोल बोर्डाचे जे काही संबंधित अधिकारी, एमआयडीसीचे आरओ, तुम्ही अशी समीती गठीत करावी. दुषीत पाणी आपण त्यांना देतो. वारक-यांचा विचार करुन पाणी देण्याबाबत विरोध नाही. परंतु भविष्यामध्ये सुध्दा खालची गाव असतील चिखली, च-होलीला या सर्व लोकांच्या आरोग्याला हनीकारक असं आहे. त्यामुळे मा.आयुक्तांनी त्यावर पहीलं कटाक्षाने लक्ष देऊन हे पाणी ट्रिट करुन कसे सोडता येईल याच्यावर खर्च कितीही झालातरी त्याची सुरवात आयुक्त साहेब आपण पहील्यांदा करा. हे फिल्ट्रेट वॉटर आपण सोडल पाहीजे. याच्यामध्ये अजून असं लिहील होतं की त्यांच्या सीओने विनाशुल्क पाणी मागीतलेले होते. तुम्ही २ लाख ली. पाणी देणार आहेत. तुम्ही विषय मंजूर करता ही आनंदाची बाब आहे परंतु २ लाख ली. च्या प्रमाणे दिवसाआड म्हणतो. म्हणजे आपण ३० लाख ली. पाणी देणार आहेत आणि ३० लाख ली. पाणी जर देणार असुतर २.५० रु. नी त्याचे ७५ लाखच होणार आहेत. मग ते ७५ लाख रु. या महापालिकेच पापच आपण केलेल आहे, वारक-यांसाठी काहीतरी पुण्यांच काम आपण करतोतर हे पाणी मोफत दयावे अशी सूचना आपण करावी अशी आपल्याला विनंती करतो. मोफत दया ७५ लाखानी काय होणार आहे आणि येथून पुढे भविष्यात तुम्ही प्रशासनाला अशी ताकीद दया की असे प्रदुषीत पाणी यापुढे जाणार नाही याची दखल घेवून आयुक्तांनी कारवाई करावी असे आदेश दयावेत तुमच आम्ही अभिनंदन करु.

**मा.महापौर -** प्रदुषीत पाणी जाणार नाही याची दखल घेवून आयुक्तांनी कारवाई करावी. हा विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/२५१६/२०१६ दि.२२/१२/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१९७१७ दि.२७.१२.२०१६

३) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२००३८ दि.०३.०१.२०१७

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १० दि.२०/४/२०१७

शिक्षण मंडळ विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१७-२०१८ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे. शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रकास मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे कलम १५४ (२) अन्वये दिनांक १ जानेवारी पूर्वी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. सन २०१६-२०१७ च्या ४ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ८ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कमा नमूद केलेल्या आहेत. शिक्षण मंडळ सभेने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांचेशी चर्चा करुन सन २०१६-२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु. १२४,२२,५४,०००/- चे व सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.१२५,६९,०४,०००/- मान्यतेकामी सादर केलेले असलेतरी शिक्षण मंडळाने सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यानुसार मा.शिक्षण मंडळाने सुचविल्याप्रमाणे सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक रु.१४८,६०,२४,०००/- व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक रु.१५१,०५,२४,०००/- ची मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अंमलबजावणी करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.शैलेश मोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.मोरेश्वर भोंडवे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ३४ विषय क्रमांक – १

दिनांक – १९/५/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/२५१६/२०१६ दि.२२/१२/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१९७१७ दि.२७.१२.२०१६

३) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२००३८ दि.०३.०१.२०१७

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १० दि.२०/४/२०१७

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०


अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट क्ल्य

--------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/९/कावि/३०२/२०१७
दिनांक - २१/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.